**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८२
सुनावणी दिनांक: २६.१०.२०१०

१ श्री. उमाशंकर वैजनाथ माळोदे, : अपिलार्थी :उपस्थित
रा. कोळसा, ता. सेनगाव, जि. हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, हिंगोली
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, हिंगोली

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली | :अनुपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, हिंगोली | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबूजून अपूर्ण माहिती दिली व उर्वरित माहिती देण्याचे ते लांबवत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेनगाव येथील कालबाह्य औषध प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची व संबंधित साठ्याच्या तत्कालीन स्थितीची माहिती व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाकडे केला होता. त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीचा सदरचा अर्ज तालुका कृषि अधिकारी सेनगाव यांना त्यांच्या दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे वर्ग करुन, अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी, सेनगाव यांच्याशी संपर्क साधून माहिती मिळविण्याचे सूचित केले. या

पत्राची प्रत त्यांनी तालुका कृषि अधिकारी, सेनगाव यांना अग्रेषित करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०७.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्याने दिनांक २९.०८.२००९ रोजी निर्णय देऊन तालुका कृषि अधिकारी, सेनगाव यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २१.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. सदर प्रकरणाची आज दिनांक २६.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी वेळोवेळी पत्राद्वारे व व्यक्तिशः संपर्क साधूनही, त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे आयोगास अवगत केले होते व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली होती. तर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती तो अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १७.१२.२००८ रोजी प्राप्त झाला असून, या प्रकरणी त्यांनी केलेल्या चौकशी अहवालाच्या संदर्भात त्यांनी संबंधित गोडावूनमध्ये खते व औषधे बदलून नवीन खते व औषधांचे वाटप शेतकऱ्यांना या नंतरच्या कालावधीमध्ये केलेले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्याकडून त्यांच्या दिनांक ३०.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे,दिनांक २२.०७.२००८ रोजी तहसीलदार, सेनगाव यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेनगाव यांच्या गोदामात असलेला कालबाहय साठा सिलबंद केल्याप्रकरणी सक्षम प्राधिकरणाने केलेला चौकशी अहवाल, या चौकशी अहवालावर झालेली कार्यवाही आणि खते व औषधे यांच्या साठयाची तत्कालीन स्थिती या मुद्यांसंदर्भात माहिती आवश्यक होती, असे दिसून येते. या अर्जातील संदर्भित केलेला चौकशी अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.१२.२००८ रोजी प्राप्त झाला होता. यानंतर त्यांनी संबंधित औषधे व खते गोदामातून पुरविण्याबाबत कार्यवाही सुरुही केली होती. परंतु असे असूनही त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. अंतिमतः जुन - जुलै २००९ म्हणजे अपिलार्थीने माहिती मागितल्यानंतर त्यांनी कालबाह्य झालेल्या औषधांचा साठा बदलला. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०.०४.२००९ रोजी या प्रकरणी त्यांच्या

कार्यालयाकडे दिनांक १७.१२.२००८ रोजी प्राप्त झालेला चौकशी अहवाल, या अहवालावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने संबंधित प्राधिकरणाशी दिनांक ३०-०४-२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या संदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती आणि कालबाहय औषधे व खते यांच्या साठ्याची तत्कालीन स्थिती अपिलार्थीस कळविण्यासाठी त्यांना कोणतीही अडचण नव्हती. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही या प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्याकडील बऱ्याचशा पत्रांद्वारे जन माहिती अधिकारी व तालुका कृषि अधिकारी, सेनगाव यांच्याकडे या संदर्भात माहितीसाठी बराच पाठपुरावा केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत आहे. वर म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य देय होत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने असे निर्देश दिले होते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणाच्या चौकशी अहवालाच्या झेरॉक्स प्रती, या प्रकरणी त्यांच्या कार्यालयाने विविध प्राधिकरणाशी दिनांक ३०-०४-२००९ रोजीपर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, त्यांच्या कार्यालयाकडील या विषयावरील अभिलेख्यामधील टिपणीच्या प्रती, कालबाह्य झालेल्या औषध व खतांच्या साठ्याची तत्कालीन स्थिती (वाटप रजिस्टरची प्रत) अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे आयोगास असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि एका मुद्यावर माहिती त्यांना मिळाली नाही, तो मुद्दा असा आहे की, त्यांच्या दि.३०.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या चौकशी अहवालावर झालेल्या कार्यवाहीची माहिती. तरी या मुद्यासंदर्भात, केलेल्या कार्यवाहीच्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस, हे आदेश जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होताच त्यांनी पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने दिनांक ३०.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणाच्या चौकशी अहवालावर झालेल्या कार्यवाहीची माहिती,या मुद्यासंदर्भातील माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस, हे आदेश त्यांना प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात याव्यात.

**औरंगाबाद** **( दी.बा.देशपांडे ),**
**दिनांक २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उमाशंकर वैजनाथ माळोदे, रा. कोळसा, ता. सेनगाव, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कृषि अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८३
सुनावणी दिनांक : २६.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. के. एल. काकडे,<br>मु. पो. ता. पूर्णा, जि. परभणी | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग<br>क्र.२, परभणी | : प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास<br>प्राधिकरण, औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २१.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. सदर प्रकरणात पुनश्च् आज दि. २६.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक ०५.११.२००९ रोजी पोस्टाद्वारे पुरविल्याचे आयोगास अवगत केले असून जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक ०५.११.२००९ रोजी म्हणजेच, त्यांनी आयोगाकडे दिनांक २७.१०.२००९ रोजी अपील केल्यानंतर दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारे या प्रकरणी

अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर त्यांना विनामूल्य प्राप्त झाली असल्यामुळे, आता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्यामुळे आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.१०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. के. एल. काकडे, मु. पो. ता. पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८४
सुनावणी दिनांक : २६.१०.२०१०

१ श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, रा.परभणी. : अपिलार्थी :अनुपस्थित

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण तथा अधिष्ठाता (पशु विज्ञान),महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

आज रोजी प्रत्यक्षात :

१.जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर :उपस्थित

२.जन अपिलीय अधिकारी : अधिष्ठाता (निम्न शिक्षण), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१०.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. सदर प्रकरणाची आज दि.२६.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून प्रकरणात आयोगाने असे अभिप्राय दिले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे, २००७ पासून त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी /अधिकाऱ्यांनी शासनाकडे केलेल्या परस्पर पत्रव्यवहाराबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता,अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मत्स्य व्यवसाय विभागाकडून शासनाकडे परस्पर पत्रव्यवहार केला असता, किती प्रकरणामध्ये विद्यापीठाकडून शासनाने अहवाल अथवा स्पष्टीकरण मागितले आहे, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस अपेक्षित होती. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या बाबतीत अशाप्रकारच्या तक्रार करणाऱ्या प्रत्येक विद्यापीठाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे नाव, पद व त्यावर विद्यापीठाने केलेली कार्यवाही, या मुद्यावरील माहिती मोघम स्वरुपाची आहे. तसेच या प्रकरणी शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन कदाचित विद्यापीठाकडे संबंधित प्रकरणातील चौकशी सुरु असल्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. अपिलार्थीने या मुद्यावर मागितलेल्या माहितीपैकी काही प्रकरणी अशाप्रकारची माहिती उघड केल्याने चौकशी प्रकरणामध्ये अडथळे निर्माण होऊन अधिनियमातील कलम ८(१)(छ) व (ज) चा भंग होण्याची शक्यता संभवत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना अधिनियमातील कलम ८(१) च्या तरतुदीचा भंग होणार नाही, अशा दृष्टीने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती उघड करावी. जर एखाद्या प्रकरणी माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) चा भंग होईल, अशी जन माहिती अधिकारी यांची खात्री असल्यास अशा माहितीचा भाग वगळून, त्यांना या मुद्यावर अपिलार्थीस माहिती उघड करण्यास कोणताही प्रत्यवाय असू नये. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील, "कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे" या भागावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या

शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रत्येक तक्रारीवर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील अशी माहिती मागितली आहे. तथापि 'कार्यवाहीचा तपशील' म्हणजे निश्चितपणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. त्यामुळे प्रत्येक तक्रार अर्जावर विद्यापीठाच्या प्रशासनाने घेतलेला अंतिम निर्णय त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर, माहिती म्हणून कळवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की,मा.आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार दि. १३.०७.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्याची प्रत आज रोजी आयोगास सादर करण्यात आली. तथापि सदर माहिती अपिलार्थीस मिळाली किंवा नाही, याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या नस्तीवर नाही, असे दिसून येत आहे. तथापि आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही लेखी युक्तिवाद दाखल केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असावी, असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अपिलार्थीचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्यास अधिनियमातील कलम १८ खाली आयोगाकडे तक्रार करण्याची त्यांना मुभा आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख,घ.क्र.७८७, प्लॉट क्र. ९, भाग्यलक्ष्मीनगर,

शंकराचार्य मंदिरासमोर,परभणी -४३१ ४०१.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल, नागपूर - ४४४ ००६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता (निम्न शिक्षण),महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,सेमिनरी हिल, नागपूर - ४४४ ००६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८६
सुनावणी दिनांक : २६.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>रा.जालना. | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद सिंचन विभाग,जालना | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे जिल्हा परिषद,<br>उप-विभाग जालना | :उपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | कार्यकारी अभियंता<br>(ल.पा.)जि.प.जालना | :अनुपस्थित |
| त्रयस्थ पक्ष : | श्री. फय्याज (उपअभियंता) | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०१.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने आणि त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रतीचे विवरणपत्र देण्यात आले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकड त्रयस्थ पक्ष, श्री. फय्याज उपअभियंता यांच्या सन २००७-०८ ते दि. ३०.०१.२००९ पर्यंतच्या कालावधीतील कामाची तपासणी केलेल्या कामाची कामनिहाय माहिती व मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतींची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन विभाग, जालना यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीचा अर्ज दि. २६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ल.पा.जि.प. उपविभाग जालना यांच्याकडे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३,४००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे,जि.प.उपविभाग,जालना यांनी अपिलार्थीस दि. ०२.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्याकडे उपस्थित राहिले नाहीत व यानंतर त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २६.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना माहिती न मिळाल्याचे प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत केले व आयोगास असे सांगितले होते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २९.०७.२००९ व २९.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले तथापि सदर माहिती अपिलार्थी, त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन गेले नाहीत.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन विभाग, जालना यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दि. ३०.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्यापासून अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे, या अर्जाची प्रत पाच दिवसांच्या आत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे, त्यांच्याकडे पाठवावयास हवी होती. तथापि त्यांनी या तरतुदीचा भंग करुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित उपअभियंता यांच्याकडे दि. २६.०२.२००९ रोजी म्हणजेच, २१ दिवसांच्या विलंबाने पाठविला आहे. कार्यकारी अभियंता यांनी अशाप्रकारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) सारख्या महत्त्वाच्या तरतुदीचा भंग केला

असल्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य पुरवावी लागेल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

मागील सुनावणीमध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०६.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात अपिलार्थीस माहिती मिळाल्याच्या पोचपावतीची प्रत आज आयोगास अवलोकनास्तव सादर केली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,संपादक,सा.ब्रम्हास्त्र, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, रेल्वेस्टेशन,ऑ.नं.२७, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उप-विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८७
सुनावणी दिनांक : २६.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,<br>रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर,<br>जिल्हा लातूर | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | | :अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | :उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष | : | १.श्रीम. रहमतबी भ्र.म.इस्माईल | :अनुपस्थित |
| | | २.मलंग नुरोद्यीन पि.म.इस्माईल | :अनुपस्थित |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०६.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना विलंबाने व खोटी माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता क्रमांक ४-२-५१, ४-२-६० व १-३-५८ क्रमांकाची लांबी-रुंदी, घर क्र.४-२-६० च्या लांबी रुंदी मधून घर क्र.१-३-५८/१-(नामे- मलंग

नुरोद्दीन पि.म.इस्माईल) नुसार किती लांबी रुंदीच्या नामांतर करण्यात आले आहे त्याचे आकारमान, सदर घर क्र.१-३-५१/१ च्या नामांतर झाल्यानंतर घर क्र. ४-२-६०/ १-३-५८ (नामे रहमतबी भ्र.म.इस्माईल) ची किती जागा शिल्लक राहिली त्याचे लांबी-रुंदीमध्ये आकारमान, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २१.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते आणि जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २६.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, ते आज रोजी सुनावणीसाठी या प्रकरणाशी संबंधित नस्ती सोबत आणावयाचे विसरले आहेत. संबंधित लिपीकाने त्यांना आजच्या सुनावणीच्या विषयाची नस्ती न पुरविल्यामुळे त्यांना आजच्या प्रकरणाविषयी काहीही सांगता येणार नाही. परंतु या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली आहे, हे निश्चित.

प्रकरणात आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**

**दिनांक २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८८
सुनावणी दिनांक: २६.१०.२०१०

१ श्री. राज सतीश क्षिरसागर, : अपिलार्थी :अनुपस्थित
सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, रोड नं. १५, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी :अनुपस्थित
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद कार्यालय, लातूर :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०९.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना मालमत्ता अधिका-याने माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, लातूर शहरातील सर्वे नंबर १८२ येथील ग्रेन मार्केटमधील गाळे वाटपासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्वे नं. १८२ ग्रेन मार्केट येथील बांधण्यात आलेल्या गाळयांची संख्या, त्यापैकी वाटप झालेल्या व शिल्लक असलेल्या गाळयांची संख्या, वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी आणि कोणत्या नियमाप्रमाणे गाळे वाटप करण्यात आले त्याची माहिती, किती भाडेकरु बागवान आहेत, त्यांना कोणत्या नियमानुसार गाळे वाटप करण्यात आले, एकाच व्यक्तीला पाच गाळे कोणत्या नियमान्वये देण्यात आले, असे आरक्षित गाळे किती आहेत व त्याचे शुल्क किती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांच्याकडे

दिनांक १८.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०८.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने सदर माहिती अपूर्ण असल्याच्या त्यांच्या अभिप्रायासह ही माहिती मिळण्यासाठी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २१.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रकरणात आज दि. २६.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

दि. २१.०६.२०१० रोजीच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दिनांक २२.०६.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीने जी माहिती त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितली आहे, त्या माहितीबाबत त्यांना कुठल्याच प्रकारची माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगाच्या दृष्टीक्षेपात आलेल्या गोष्टी व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही विस्कळीत स्वरुपात असून, त्यामध्ये अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे लातूर येथील ग्रेन मार्केटमधील एकाच व्यक्तीला पाच गाळे कसे देण्यात आले याबाबतच्या माहितीचा यामध्ये समावेश नाही. संबंधितांच्याकडून गाळे वाटप, शुल्क याचाही त्यामध्ये समावेश नाही. कोणते गाळे आरक्षित आहेत याबाबतचीही त्यांना कोणतीही माहिती दिलेली नाही. नवे पोट भाडेकरु ठेवण्यात आले आहेत अशा पोटभाडेकरुंची संख्या या माहितीचाही या माहितीमध्ये समावेश नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णपणे विस्कळीत स्वरुपात आणि अपूर्ण माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राज सतीश क्षिरसागर, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, रोड नं. १५, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०४
सुनावणी दिनांक: २६.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जालींधर जयवंत नागरगोजे,<br>रा. प्लॉट नं. पी. ४/४/६, विठ्ठलनगर, एन-२, सिडको,<br>औरंगाबाद. | : अपिलार्थी | : उपस्थित<br>(प्रतिनिधी<br>श्री.एस.एम.मुंडे) |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,<br>नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,<br>नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | सहायक अभियंता श्रेणी-२,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,<br>नाथनगर (उत्तर), पैठण, जि.<br>औरंगाबाद | :अनुपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | उपविभागीय अभियंता, जायकवाडी<br>पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर),<br>पैठण, जि. औरंगाबाद | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०८.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या वेळी त्यांनी माहिती अधिकाराखाली मागणी केलेली माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे त्यांच्या विरोधात नियमानुसार योग्य ती कारवाई होऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील जायकवाडी प्रकल्प डाव्या कालव्याच्या संदर्भात सन २००४ ते ०९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून त्यामध्ये - जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातील पाण्याचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलती, त्यांच्याकडून दरवर्षी वसूल केली जाणारी पाणी पट्टीची रक्कम, या कालव्याच्या कार्यक्षेत्रात केली जाणारी कामे, या संदर्भातील निविदा, जाहिराती ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातात त्या वर्तमानपत्राचे कात्रण, जाहिरात प्रकाशित करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या प्रती, या कालव्यावर एकूण पुलांची संख्या, या पुलांच्या दुरुस्तीची कामे केव्हा केली जातात याचे अंदाजपत्रक, कालव्यावरील उप कालव्याची संख्या ते कोणकोणत्या विभागात आहेत त्यांची गाववार यादी व उप कालव्यांची साफसफाई कधी करण्यात आली त्याची अंदाजित रक्कम, कार्यालयातील अभियंत्यांना महिन्यासाठी किती रक्कम आगाऊ स्वरुपात दिली जाते व त्यातून ते कोणता खर्च भागवितात याची संबंधित कर्मचाऱ्यांची नावे व त्यांना देण्यात आलेली रक्कम, प्रत्येक पुलांची अंदाजीत कामाची रक्कम किती व पूर्ण केलेल्या रोडच्या कामाची यादी व अर्थ संकल्पनीय रक्कम, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होणारा वार्षिक बजेट, यातून पूर्ण करण्यात आलेल्या कामाची रक्कम, एम. बी. च्या प्रती इत्यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४.०७.२००९, ०८.०७.२००९ व १४.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडे त्यांच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्राबाबत सबळ पुराव्याची मागणी केली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०.०७.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१.०८.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ ते ८ ची माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या अर्जास दिनांक ०४.०७.२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीच्या अर्जासोबत सादर केलेले दारिद्र्यरेषेखालील

प्रमाणपत्र अस्पष्ट असल्याबाबत व ते कोणत्या वर्षाचे आहे हे स्पष्ट होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तसेच दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती त्यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली व नंतर दिनांक १४.०७.२००९ रोजी परत दारिद्र्यरेषेखालच्या सुस्पष्ट प्रमाणपत्राची मागणी केली. परंतु अपिलार्थीने त्यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र कधीही सादर केले नाही. यानंतर अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दिनांक १६.११.२००९ व २०.११.२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि त्यांनी या बाबतचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी वारंवार मागूनही अपिलार्थीने त्यांना दारिद्र्यरेषेखालच्या सुस्पष्ट प्रमाणपत्राची प्रत देण्याचे टाळले असल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय झाल्यानंतर आणि अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्रथमतः दिनांक १६.११.२००९ रोजी व तदनंतर दिनांक २०.११.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मधील, मोजमापपुस्तिकेच्या छायांकित प्रती आणि ही कामे किती संस्थांना देण्यात यावीत, अशा अर्थाच्या शासनाच्या आदेशाच्या प्रतीच्या माहितीचा त्यामध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीस आता द्यावयाची या मुद्यावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज करताना त्यांच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्राबाबत कोणताही सबळ पुरावा सादर केला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मधील उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा सादर केला तर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी अन्यथा ही माहिती त्यांनी अपिलार्थीस सशुल्क पुरवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात आले होते की, त्यांना अद्यापही या माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्राचा सबळ पुरावा टपालाने सादर

करावा, अन्यथा जन माहिती अधिकारी सूचित करतील त्याप्रमाणे शुल्काचा भरणा करुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. या मुद्याबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४.०७.२००९ व १४.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्राबाबत कळवूनही अपिलार्थीने त्यांना कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करीत आहे, असे मागील सुनावणीमध्ये सूचित करण्यात आले होते.

आज रोजी अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.एस.एस.मुंडे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगासमोर असे सांगितले की,आतापर्यंत त्यांना माहिती मिळालेली नाही,

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक : २६.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जालींधर जयवंत नागरगोजे, रा. प्लॉट नं. पी. ४/४/६, विठ्ठलनगर, एन-२, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७१

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सानप अंकुश साहेबराव,<br>रा. प्लॉट क्र. १७६, शास्त्रीनगर, हेडगेवार<br>हॉस्पीटलच्या मागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग,<br>बीड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प<br>मंडळ,<br>परळी (वैजनाथ), जिल्हा बीड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर होते व जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाने मागील दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ वगळता उर्वरीत संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः पुरवावी असे निर्देशित केले होते. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी कळविले होते परंतु अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केला नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही. आयोगाचे निर्देशानुसार त्यांनी दिनांक ०८-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती घेऊन जाण्याचे कळविले होते. तथापि अपिलार्थीने अद्यापपर्यंत त्याप्रमाणे शुल्क भरुन माहिती नेली नाही. माहिती तयार आहे.

वरील बाबी विचारात घेता असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ वगळता उर्वरीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात यावी.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सानप अंकुश साहेबराव, रा. प्लॉट क्र. १७६, शास्त्रीनगर, हेडगेवार हॉस्पीटलच्या मागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वैजनाथ), जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७३

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धोंडीरामजी अन्नासाहेब देशमुख, संपादक 'सा. जालना शक्ती', देहडकरवाडी, जुना जालना तालुका जिल्हा जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना | : | प्रतिनिधी- श्री. व्ही. ए. सोनवणे, सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना -उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरवून माहिती देण्यास टाळाटाळ

केली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एम. एच. कासार यांच्यावर सचिव (वने) यांना शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२०१० रोजी संपूर्ण माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे व ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

सचिव (वने) यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी,सामाजिक वनीकरण, वनपरिक्षेत्र जाफ्राबाद श्री. एम.एच. कासार यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २६-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धोंडीरामजी अन्नासाहेब देशमुख, रा. देहडकरवाडी, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७४

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान, औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, जालना | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद | : | प्रतिनिधी- श्री. सुरेश काचावर, सहायक संचालक -उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, जालना | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ अंशतः (मनिसाना आयोगाच्या शिफारशीची कागदपत्रे वगळता) व मुद्दा क्रमांक ६ या मुद्दयावरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः देण्याचे आदेशीत करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०६-२०१० रोजी आयोगाने दिनांक १९-०६-२०१० रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे संपूर्ण माहिती दिल्याचे

आयोगासमोर सांगितले. तसेच माहिती मिळाल्याबद्दल अपिलार्थीने पोच दिलेली आहे तसेच दिनांक २५-१०-२०१० रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे लेखी आयोगाला सुध्दा कळविले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २६-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान, (संपादक,साप्ताहिक-बरसता तुफान) औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७५

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवदास दामोधर शहाणे,<br>रा. नूतन वसाहत, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कृषि अधिकारी, तालुका फळ रोपे वाटिका,<br>वडीगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, तालुका<br>परतूर, जिल्हा जालना | : | उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | फलोत्पादन अधिकारी, तालुका फळ रोपवाटिका, वडीगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी संबंधित बांधकामाच्या बिलाच्या प्रती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने दिनांक १९-०६-२०१० रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २०-०६-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाने

माहिती पाठविली असल्याचे सांगितले. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २६-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, रा. नूतन वसाहत, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा फलोत्पादन अधिकारी, तालुका फळ रोपवाटिका, वडीगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७६

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

१ श्री. देशमुख मोहमद हारुण अमीनमियाँ, : अपिलार्थी : अनुपस्थित
व्दारा- न्यू इंडिया फूट वेअर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रादेशिक निवड समिती, औरंगाबाद उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांचे कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : उपस्थित
तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद : उपस्थित

त्रयस्थ पक्ष : श्री. देशमुख मोहमद जावेद अमीनमियाँ : अनुपस्थित

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील भूकरमापक/टंकलेखक(टायपिस्ट) या पदांची भरती करण्याकरिता त्यांच्या कार्यालयाने दि. २८.०९.२००८ रोजी घेतलेल्या लेखी परीक्षेसंदर्भात दि. १२.०८.२००८ ते ०२.०१.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दहा मुद्याद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठीच्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ते ८ बाबतची माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून अप्राप्त असल्याचे कळविले व सदर माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस

पुरविण्याचे त्यांना आश्वासित केले व मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात अपिलार्थीस शुल्क रु. ६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरुन ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व मुद्दा क्र. १० च्या संदर्भात त्यांनी निवड समितीच्या सदस्यांच्या पदनामाची यादी अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर होते व जन माहिती अधिकारी हजर होते. प्रकरणात आज दि. २६.१०.२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१२.०१.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदरची माहिती जमाबंदी कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व त्यांच्या कार्यालयातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित माहितीसाठी आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० मध्ये मागणी केलेल्या निवड समितीच्या सदस्यांच्या पदनामाची यादी अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित मुद्यांवरील माहिती त्यांच्याकडे आजही उपलब्ध नाही.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित, त्यांनी मागणी केलेली माहिती उघड न करण्याची घेतलेली भूमिका आजवर आयोगाने घेतलेल्या भूमिकेशी सुसंगत आहे. आयोगाकडे वेळोवेळी दाखल झालेल्या अशा प्रकारे उत्तरपत्रिकांच्या प्रतीची मागणी करणाऱ्या अनेक अपिलार्थींच्या अर्ज प्रकरणी, अशी माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) चा भंग होत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उघड करता येणार नाही, अशी भूमिका आयोगाने घेतलेली आहे. कारण ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी आणि संबंधित परीक्षक यांच्यातील विश्वासाश्रित संबंधामुळे त्यांना प्राप्त झाली आहे. या प्रकरणी देखिल ती माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) (ङ) चा भंग होणार असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती उघड न करण्याची कृती बरोबर आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५,६ व ७ शी संबंधित माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस उघड न करण्याच्या समर्थनाविषयी जन माहिती अधिकारी यांनी

केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने भूकरमापक / टंकलेखक (टायपिस्ट) पदाकरिता त्यांच्याकडे घेण्यात आलेल्या परीक्षेच्या आदर्श उत्तरपत्रिका(Answer Key) ची प्रत उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होईल, अशी आयोगास खात्री आहे. अशा प्रकारच्या आदर्श उत्तरपत्रिका (मॉडेल आन्सर की)उघड केल्याने, या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले, त्यांना, त्यांचे नेमके कोठे चुकले याचा बोध होऊन त्यांना स्वतःच्या कार्यशैलीमध्ये सुधारणा घडवून आणता येईल, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती आता उघड करावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तोंडी परीक्षेत मुलाखत घेणाऱ्या समितीने मुलाखतीस जे गुण दिले आहेत त्यांच्या स्व-हस्ताक्षरातील दिलेल्या सर्व उमेदवारांच्या गुणाची यादी गुणासह, आरक्षणासह मागितली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, ही माहिती उघड केल्याने काही अंशी अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) चा निश्चितपणे भंग होईल, तथापि अपिलार्थीस त्यांना मुलाखतीमध्ये प्रत्येक परीक्षकाने दिलेले गुण ज्ञात करुन घेण्याचा हक्क आहे, असे आयोग मानतो. सबब, जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातल कलम १० च्या तरतुदीचा वापर करुन, असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्याकडे संबंधित निवड समितीने तोंडी परीक्षेत मुलाखत घेताना प्रत्येक परीक्षकाने जे गुण विद्यार्थ्यांना दिले आहेत, त्या गुणपत्रिकेवरील संबंधित परीक्षकांची नावे, परीक्षकांच्या सह्या अथवा अनुषंगिक माहिती उघड न करता, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यास हरकत नाही. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, परीक्षकाच्या हस्ताक्षरावरुन अपिलार्थीस कोणत्या परीक्षकाने किती मार्कस् दिले, याचा बोध होऊ शकेल. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती संबंधित परीक्षकाच्या हस्ताक्षराच्या स्वरुपात न देता, ती माहिती त्यांनी टंकलिखीत करुन नंतर अपिलार्थीस पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व्दारे, अपिलार्थीने परीक्षकांची नावे, त्यांचे पद व त्यांचे पत्ते, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाशी सहमती दर्शवून, ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (छ) चा भंग होणार असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस उघड न करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य आहे.

अशा प्रकारे अपिलार्थीस अद्याप जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची माहिती व अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली माहिती, याचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज योग्य प्रकारे भरलेला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या माध्यमाव्दारे माहिती अपेक्षित आहे, त्याचा त्यांनी योग्य तो खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे "व्यक्तिशः न भेटल्यास रजिस्टर्ड पोच पावतीव्दारे", अशा दोनही माध्यमाव्दारे माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्या माध्यमाव्दारे अर्जदारास माहिती अपेक्षित आहे याचे विकल्प अर्जदारास उपलब्ध करुन दिलेले आहेत. यापैकी अर्जदाराने एकाच विकल्पाची निवड करणे अभिप्रेत आहे. या बाबत अपिलार्थीने दोनही विकल्प निवडले असल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती देऊन विहित मुदतीत प्रतिसाद दिल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने काढलेले निष्कर्ष कायम ठेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्यांशी संबंधित वर नमुद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** — **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २६-१०-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोहमद हारुण अमीनमियाँ, व्दारा- न्यू इंडिया फूट वेअर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७७

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी,<br>किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय,<br>नांदेड | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड | : | उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सहायक निबंधक, सहकारी संस्था, नांदेड | : | उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : | सचिव नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रक्ट को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि. नांदेड | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०५०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर होते व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी खालील कारणमिमांसामुळे अपील खारीज करण्यात आले होते.

सचिव, नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि. नांदेड व जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने प्रथमतः जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरले नाही

तरीही त्यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्या आदेशाप्रमाणे संबंधित सचिव, नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि. नांदेड यांनी आवश्यक ती माहिती दिनांक ३०-०९-२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याची पोचसहीची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती सचिव, नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि. नांदेड यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सचिव, नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि. नांदेड कडून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांनी आजतागायत कोणतेही लेखी अभिप्राय पाठविले नाहीत. यावरुन अपिलार्थीस प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रतिवादीकडून नवीन कोणतीही माहिती सादर केलेली नाही, त्यामुळे मागील सुनावणीमध्ये निष्कर्षाप्रत आलेल्या गोष्टी विचारात घेता अपील खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २६-१०-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८०

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

१ श्री. तात्यासाहेब रामहरी पवार, : अपिलार्थी : उपस्थित
रा. सहाणगाव, पो. विटा, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी : अनुपस्थित
तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, निपाणी,
सहाणगाव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : अनुपस्थित
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २१-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक २१-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर होते व त्यांनी ग्रामपंचायतीकडील फॉर्म नं. २२ च्या प्रती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले होते. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जुनी माहिती दिली. सबब जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे द्यावी. यापूर्वीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघही हजर होते तरीही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावलेला आहे व माहिती न पुरविण्याचा प्रमाद घडला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी चौकशी करुन

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करावी अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या फॉर्म नंबर २२ च्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तात्यासाहेब रामहरी पवार, रा. सहाणगाव, पो. विटा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, निपाणी, सहाणगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८१

सुनावणी दिनांक २६-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालाजी नारायणराव पांचाळ,<br>रा. मु. रांजोना, पो. खांडेगाव, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली, | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>वसमत,<br>तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>वसमत,<br>तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय रांजोना, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली. | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात आधी दिनांक २१-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर होते, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या मागील दिनांक २१-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "अ", "आ", "इ" व "उ" या मुद्यांशी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाने व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे निर्देशित केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे आणि जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे याबाबत काहीही कळण्यास मार्ग नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "अ", "आ", "इ" व "उ" या मुद्यांशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत टपालाने व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालाजी नारायणराव पांचाळ, रा. मु. रांजोना, पो. खांडेगाव, ता. वसमत, जि. हिंगोली,

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय रांजोना, ता. वसमत, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती वसमत, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१४

सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीलाल बाबुलाल त्रिभुवन,<br>एस. टी. कॉलनी, फाजलपुरा, रुप महेलच्या मागे,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल,<br>जळगांव रोड, औरंगाबाद | : | प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १.जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | प्रतिनिधी<br>श्री.पी.बी.मगर,<br>उपशिक्षणाधिकारी<br>(मा.),जि.प.<br>औरंगाबाद<br>:उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल, औरंगाबाद यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी शाळा सुरु/स्थापन झाल्यापासून ते सन २००९ पर्यंत असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ११.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५.१०.२००९ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस दिनांक ११.१०.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल, औरंगाबाद यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांची शाळा ही कायमस्वरुपी विनाअनुदानित असल्यामुळे आणि त्यांच्या शाळेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांची शाळा सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येमध्ये मोडत नाही. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर करुन मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५१३२/०८ ची प्रत आयोगास सादर केली आहे. त्यामध्ये अशा प्रकारच्या विना अनुदानित संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू होत नसल्याचे मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी आदेश दिलेले आहेत.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले की, अपिलार्थीने ज्या

संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थेच्याविषयी माहिती मागितली आहे ती संस्था पूर्णतः विना अनुदानित आहे. सदर संस्था विना अनुदानित असल्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले आहे व तसे शपथपत्र शाळेच्या उपस्थित मुख्याध्यापिकेने आयोगास सादर केले आहे. या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५१३२/०८ नगर युवक शिक्षण संस्था विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यामध्ये दिनांक २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी अशा प्रकारच्या विना अनुदानित संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू असणार नाहीत असा निर्वाळा स्पष्टपणे दिला असल्याने आणि विचाराधीन प्रकरण देखील विना अनुदानित संस्थेच्या संदर्भातील असल्याने, मूळात अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असल्याचे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीस संबंधित शाळेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागता येणार नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७.१०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीलाल बाबुलाल त्रिभुवन, एस. टी. कॉलनी, फाजलपुरा, रुप महेलच्या मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल, जळगांव रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१२
सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नागनाथ राचय्या स्वामी,<br>२-६३, 'पार्वती मॅन्शन', निलंगा, तालुका निलंगा,<br>जिल्हा लातूर | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी (सा.), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : प्रतिवादी | : प्रतिनिधी -श्री. अनिल मुळे, जिल्हा प्रकल्प अधिकारी,लातूर<br>उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०६.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणाच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीच्या आत अपिलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ३ ते ६ च्या संदर्भातील दिलेली माहिती ही चुकीची, विसंगत व दिशाभूल करणारी असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ते ६ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " शासकीय सेवेत राहून पक्षपाती वर्तन करणा-या कर्मचा-याविरुध्द दंडात्मक कार्यवाही होणेबाबत " या विषयावर एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतिमतः दिनांक २३.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आज दिनांक २७.१०.२०१० रोजी प्रकरणात पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३१.०३.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ते ६ शी संबंधित त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचा प्रामुख्याने आक्षेप आहे व ही माहिती

चुकीची असल्याचे त्यांना वाटत आहे. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ ते ६ या ४ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक ३, ४ व ६ मधील काही भागाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत प्रक्रिया यामध्ये सीमित आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे विचारणे आणि माहिती अधिका-याने त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक ३ मधील '... चौकशी अहवाल मागविणे कितपत संयुक्तीक आहे ?' या भागावरील व मुद्दा क्रमांक ४ मधील 'ही दप्तर दिरंगाई आहे असे आपणास वाटत नाही काय ?' व मुद्दा क्रमांक ६ मधील 'विलंबाने मिळणारा न्याय म्हणजे लोकशाहीवरील कलंक नव्हे काय ? ' या भागांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र या मुद्दयावरील उर्वरित माहिती म्हणजे अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००६, ०८-०१-२००७, ०१-०२-२००७ व १४-०८-२००७ रोजींच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही ही माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या या अर्जावर, " आपल्या अर्जावर कार्यवाही चालू आहे व मुख्याधिकारी, नगर परिषद, निलंगा यांचा अहवाल मागविण्यात आला आहे. प्रकरण चालू आहे, जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्दात कारवाई करण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, निलंगा यांचा या कार्यालयाचे पत्र दिनांक १४-०९-२००७ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे", अशी माहिती अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस ही माहिती संक्षिप्त स्वरुपात दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखाद्या अर्जदाराच्या अर्जावर केलेली कार्यवाही म्हणजे, अर्जदाराच्या अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावरील त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००६, ०८-०१-२००७, ०१-०२-२००७ व १४-०८-२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी दिनांक २५-०२-२००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये या विषयावर विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावरील त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध असलेल्या टिपणीच्य प्रती अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भात या प्रकरणी जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर कार्यवाही करण्यास झालेल्या दिरंगाईबाबत जर एखाद्या कर्मचाऱ्यावर / अधिका-यावर जबाबदारी निश्चित केली असेल तर त्यांना या मुद्दयावरील तशी माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. जर या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणावरही जबाबदारी निश्चित केली नसेल तर त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस तसे कळवावे लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेली व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ते ५ मधील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती का अमान्य आहे यासंदर्भात स्पष्टीकरण दिलेले आहे. हे स्पष्टीकरण देताना अपिलार्थीने उपस्थित केलेल्या बाबी या पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात त्यांना जिल्हाधिकारी अथवा महसूल आयुक्त किंवा संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांच्याशी संपर्क साधावा लागेल,

असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.  वरील आदेश हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या मर्यादेमध्ये दिलेले आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबधितांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात आले होते. त्यानुसार दि. १५.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्याची पोचसुध्दा दिली आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मागील सुनावणीच्यावेळीसुध्दा अनुपस्थित होते. त्यांनी प्राप्त माहितीच्या संदर्भात आयोगाकडे कोणताही लेखी अथवा मौखिक जबाब दाखल केलेला नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७.१०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, 'पार्वती मॅन्शन', निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सा.), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१८

सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मनोहर विश्वनाथ पारखे,<br>रा. जोगश्वरी, पो. वाळुज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय,<br>जोगेश्वरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद | : | प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>जि. ओरंगाबाद | | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०८.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने आणि अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत जोगेश्वरीच्या संदर्भात दिनांक ०१.०४.२००६ ते ३१.०३.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क (रुपये ३२,९५०/- इतके )त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. परंतु अपिलार्थी, ग्रामविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांच्याबरोबर एक बैठक घेऊन त्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०५.१०.२००९ रोजी जारी केले. या इतिवृत्तावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५.११.२००९ पर्यंत सशुल्क माहिती देण्याचे सूचित केल्याचे आयोगास आढळून येत आहे. यानंतर परत गट विकास अधिकाऱ्याने दिनांक ०५.१०.२००९ रोजी ग्राम विकास अधिकाऱ्यास अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपील अर्जावर निर्णय होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिल्याचा पुरावा म्हणून, अपिलार्थीच्या ग्राम विकास अधिकाऱ्यास उद्देशून लिहिलेल्या दिनांक २७-०९-२००९ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील ११ मुद्यांवरील सर्व माहिती विनामूल्य देण्यात आली असल्याचे व याबाबतीत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पुराव्याचे आणि त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या घटनाक्रमावरुन व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे, यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.१०.२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांनी माहितीपोटीचे शुल्क भरण्याकरिता त्यांनी चलन भरुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चलन भरुन न दिल्यामुळे ते पैसे भरु शकले नाहीत, असा युक्तिवाद त्यावेळी केला होता. यावरुन विस्तार अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७.०९.२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्याची बाब तत्कालीन गट विकास अधिकाऱ्याकडे स्पष्ट केली नव्हती व तसेच ही बाब तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी देखील गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणली नव्हती, असे दिसून येत आहे.

वरील दोन सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बां. देशपांडे ),**
**दिनांक : २७.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहर विश्वनाथ पारखे, रा. जोगश्वरी, पो. वाळुज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जोगेश्वरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१९
सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय राघोजी जाधव,<br>रा. सपकाळ गल्ली, पैठण, जि. औरंगाबाद | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय पैठण, जि. औरंगाबाद | : प्रतिवादी | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय पैठण, जि. औरंगाबाद | | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यांच्या प्रथम अपिलाच्या दरम्यान त्यांना प्राप्त झालेली माहिती ही जाणुनबूजून चुकीची व दिशाभूल करणारी दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत चालविण्यात येणाऱ्या वाचनालयाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगरपरिषद पैठणमार्फत चालविण्यात येणाऱ्या वाचनालयांची संख्या, त्यामध्ये दररोज येणाऱ्या

एकून वर्तमानपत्रांची संख्या, सदर वर्तमानपत्राच्या झालेल्या रद्दीची प्रतिवर्षी कशी विल्हेवाट लावली जाते, वर्ष २००५ पासून आजपावेतो तयार झालेल्या रद्दीची विक्री करण्यात आलेली आहे काय? सदर रद्दीची प्रतिवर्षी निविदा काढण्यात आली होती का? निविदा काढली असल्यास सदर निविदा ज्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली त्या वर्तमानपत्राच्या जाहिरातीची झेरॉक्स, रद्दी विक्रीतून नगर परिषदेला प्रतिवर्षी प्राप्त झालेली रक्कम, विक्री झालेली रद्दी दरवर्षी किती व विक्री कोणत्या दराने करण्यात आली? सदर रद्दी खरेदी पावतीची झेरॉक्स प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३०-०६-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती दिली. सदर माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर अनुपस्थित होते. प्रकरणात आज दि. २७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादापृठ्यर्थ त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले होते. या निवेदनामध्ये त्यांनी असे नमूद केलेले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कारण पुढे करुन त्यांना माहिती देणे बंधनकारक नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यामुळे प्रश्नार्थक मुद्दे व माहिती अधिकार यांच्यातील परस्पर संबंधचा खुलासा अपिलार्थीने आयोगाकडे मागितला आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याचा युक्तिवाद त्यांनी या निवेदनामध्ये केला आहे. त्यांच्या मते जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयाला प्राप्त होणाऱ्या वर्तमानपत्राच्या वजनावरुन या रद्दीचे वजन कमीत कमी प्रतिवर्षी ४०८ किलो इतके असणे गरजेचे आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी त्यांना पाचही वर्षाच्या रद्दीची किंमत ६,०३८ रु. इतकी ७.५० किलो या दराने प्राप्त झाल्याची माहिती दिली आहे. हे पाहता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिली असल्यामुळे त्यांना दंडीत करण्यात यावे आणि नगर परिषद पैठण येथील पेपर रद्दीतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासंदर्भात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याना आदेशित करण्याची त्यांनी या निवेदनामध्ये अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा आयोगास सादर केलेला लेखी युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती, ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागिल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे मागणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या कृतीबद्दलची स्पष्टीकरणे व खुलासे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित अंशतः "सदर

रद्दीची प्रतिवर्षी निविदा काढण्यात आली होती का?" ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती याचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील - रद्दीच्या निविदांच्या नगरपरिषदेच्या बोर्डावर डकविण्यात आलेल्या प्रती आणि सदर रद्दी ज्या रद्दी विक्रेत्याला नगर परिषदेने विकली त्याची पोचपावती या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या दोनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, रद्दीच्या निविदाची त्यांच्या नोटीस बोर्डावर डकविण्यात आलेल्या निविदाची प्रत आणि रद्दी खरेदी केलेल्या रद्दी विक्रेत्याच्या पोच पावतीची झेरॉक्स प्रत त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या कथित विसंगत माहितीबाबतची त्यांची मते आयोगाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात आयोगाने अपिलार्थीस असे सूचित केले आहे की, त्यांनी ही बाब संचालक, नगरपरिषद प्रशासन अथवा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण यांच्या निदर्शनास आणून

त्यांच्या या मुद्यावर संबंधितांच्याकडून दाद मागवून घ्यावी. मुख्याधिकारी, नगर परिषद पैठण यांना असे सूचित केलेले आहे की, त्यांनी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयाच्या गेल्या पाच वर्षातील रद्दी विक्री प्रकरणाची त्यांच्या पातळीवर सखोल चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई आयोगाने आदेशित करण्याची विनंती केली आहे व त्यांना मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अपिलार्थीचे स्वतःचे होते. त्यांनी, त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधीही स्वतः होऊन संपर्क साधला नाही. यासंदर्भातला कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नसल्याने अथवा आज रोजी सुनावणीच्या वेळी या मुद्यावर कोणतेही स्पष्टीकरण दिले नसल्यामुळे व तसेच अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने टाळले असल्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोगाने अमान्य केली आहे.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेली वस्तुस्थिती व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती (निविदा जाहिरातीच्या प्रती व खरेदी पावतीची झेरॉक्स प्रत) अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

| | | |
|---|---|---|
| **औरंगाबाद** | | **( दी. बा. देशपांडे ),** |
| **दिनांक :** | **२७.१०.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त,** |
| | | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. संजय राघोजी जाधव, रा. सपकाळ गल्ली, पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२१
सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिर्झा फैजुल्ला बेग अहमद बेग,<br>रा. हनुमान चौक, माजलगाव, जि. बीड | : अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस उपअधीक्षक कार्यालय, माजलगाव, जि. बीड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>माजलगाव, जि. बीड | :उपस्थित |
| जन अपिलीय अधिकारी : | अपर पोलीस अधीक्षक, बीड | :अनुपस्थित |
| त्रयस्थ पक्ष : | १) श्री. किसन देवराव पवार<br>२) श्री. माणिक कारभारी मुंडे<br>३) श्री. बाळासाहेब मुक्ताजी धुमाळ | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०७.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेताना दोन्ही पक्षाचा जवाब नोंदवून न घेता फक्त बिन कामाची चर्चा केली व त्यांचे प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याबाबत कोणताही सबळ पुरावा

दिला नाही आणि तपासी अंमलदाराने त्यांचे प्रकरण द्वेष भावनेने निकाली काढल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) नुसार कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना पोलीस स्टेशन माजलगाव येथे, जिवे मारण्याची धमकी देऊन दहशत निर्माण केल्याबाबत दिलेल्या तक्रार अर्जावर कोणत्या पोलीस अधिकाऱ्याने तपास केला त्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव व पद, त्या पोलीस अधिकाऱ्याने एफ. आय. आर. जारी करुन अपिलार्थीने दिलेल्या अर्जासंदर्भात विहित मुदतीत विहित कार्यप्रणालीनुसार काय काय व कोणती कायदेशीर कारवाई केली, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती एकूण १० मुद्यांद्वारे मागितली आहे. तथापि या अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ वगळता इतर मुद्यांद्वारे अपिलार्थीने त्यांना ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रकरणाचे वर्णन व ती माहिती अपिलार्थीस कशा प्रकारे हवी आहे याचे विवेचन केले आहे. अपिलार्थीने सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०४-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ०६-०५-२००९ रोजी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्या प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०५-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. सदर प्रकरणात आज दि.२७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या जमिनीतील बाजरी, कापूस, तूर, ज्वारी इत्यादी उभी पिके चोरुन नेल्याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तक्रार केली असता व पिके चोरुन नेण्याची त्रयस्थ पक्षाची कृती ही दिवाणी स्वरुपाची नसून संपूर्ण दखल पात्र फौजदारी गुन्ह्याच्या स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी प्रथम एफ आय. आर. जारी करुन गुन्हा नोंदवून दखल घेणे या प्रकरणी गरजेचे होते. तथापि त्यांनी असे न करता ही बाब दिवाणी स्वरुपाची दाखवून त्यांचा अर्ज दंडाधिकारी माजलगाव यांच्याकडे न पाठविता तो स्वतः निकाली काढला. ही बाब कायद्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याने शिस्तभंग व कर्तव्यात कसूर यात येते म्हणून माजलगाव पोलीस अधिकारी व जन माहिती अधिकारी, पोलीस उपअधीक्षक, माजलगाव यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांना २५०००/- दंड आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे व या प्रकरणी अपिलार्थीचे ५२०००/- रु. किमतीच्या पिकाचे झालेले नुकसान त्रयस्थ पक्षाने भरुन द्यावे असा हुकूम करुन अपिलार्थीचे द्वितीय अपील पूर्णतः मंजूर करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.तसेच जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेली तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्यामुळे त्यांच्या कार्यालयातील पोलीस हेड काँस्टेबल श्री. भोसले यांनी चौकशीअंती अपिलार्थीचे प्रकरण निकाली काढले व त्यांनी तसे अपिलार्थीस दिनांक ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अवगत केले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली असली तरीही यातील मुद्दा क्रमांक ७ व ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांमध्ये अपिलार्थीने त्यांना ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे त्या प्रकरणाचे सविस्तर वर्णन केले आहे. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितलेली नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर सदर माहितीच्या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः कधी संपर्क साधला होता, याबाबतचा कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केलेला नाही. तथापि अपिलार्थीच्या दिनांक १७.०४.२००९ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०४.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४.०५.२००९ रोजी आवश्यक असलेली माहिती दिली आहे व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोचसही देखील जन माहिती अधिकाऱ्याने आयोगास सादर केली आहे. यावरुन ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी "तहसीलदार यांचे पत्र वसूल नसल्याने पुढील कारवाई करण्यात आली नाही" असे नमूद केले आहे. यामध्ये "वसूल" शब्दाच्या ऐवजी "प्राप्त" हा शब्द हवा असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले. तेव्हा या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस बिनचूक माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित अपिलार्थीस माहिती देताना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी या विषयावर दिनांक १३.०३.२००९ पर्यंत संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपिलार्थीस, या मुद्यावरील माहिती म्हणून द्यावी लागेल. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी

संबंधित ही माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीत संदर्भित केलेले त्यांचे प्रकरण हे फौजदारी गुन्ह्यासारखे असून संबंधित पोलीस हेड कॉंस्टेबल यांनी ते प्रकरण दिवाणी स्वरुपाचे समजून कार्यवाही केली असल्यामुळे त्यांच्यावर रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या तक्रार अर्जातील प्रकरणाचे स्वरुप ठरविण्यासाठी वेगळे सक्षम प्राधिकरण उपलब्ध आहे. अशा प्रकारचे निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये आयोगास विनंती केल्याप्रमाणे आयोगास कारवाई करता येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि.२४.१०.२०१० रोजी माहिती मिळाल्याचे आयोगासमोर सांगितले. तथापि त्यांना दिलेली माहिती व त्यांनी मागितलेली माहिती यामध्ये थोडा संभ्रम आढळला. आज मुद्दा क्र. ७ व ८ ची माहिती पुन्हा एकदा नीट तपासून मुद्याशी सुसंगत माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी, असे आयोगाने सूचित केले.

दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७.१०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिर्झा फैजुल्ला बेग अहमद बेग, रा. हनुमान चौक, माजलगाव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२२
सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामचंद्र मारुती कांबळे<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद | : प्रतिवादी | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर | | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०७.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी एकच व्यक्ती असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा सुनावणीसाठी बोलावून परत पाठविले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनावरुन त्यांच्या कामामध्ये भ्रष्ट कारभार झाला असेल म्हणून त्यांनी अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे अपिलार्थीस वाटत आहे, असे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची चौकशी समिती नेमून, सत्य माहिती बाहेर काढावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन

माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद जिल्हयातील सन २००५ ते २००९ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे पूर्ण झालेल्या व चालू असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात व्यापक व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे व तसे प्रमाणपत्र जोडल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८.०४.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येतआहे.

या पूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. सदर प्रकरणात आज दि. २७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रांवरुन खालीलप्रमाणे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी, "सदरील कामे ही ठेकेदारांकडून केली गेली जातात की मजूरांकडून, आर्थिक वर्षात पूर्ण व अपूर्ण कामांचे लेखा परीक्षण केले जाते का?" या मुद्यांवरील माहिती वगळता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या दोन मुद्यांवरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, या दोन मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली असल्याचे आढळून येत आहे. अशाप्रकारचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दल

अथवा निर्णयाबद्दलचे खुलासे व त्यांचे अभिप्राय अर्जदारास देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. परिणामी या दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वर नमूद केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७.१०.२०१०**

**( दि. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामचंद्र मारुती कांबळे रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२४
सुनावणी दिनांक २७.१०.२०१०

१ श्री. सूर्यकांत टी. पंचलीगे, : अपिलार्थी :अनुपस्थित
रा.तरोडा खु. ता.जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा :अनुपस्थित
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड

आज रोजी प्रत्यक्षात :
जन माहिती अधिकारी : गट शिक्षणाधिकारी, : अनुपस्थित
पंचायत समिती, नांदेड

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ०९.०३.२००९ रोजीचा मूळ अर्ज, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांच्याकडे तो दि. १६.०३.२००९ रोजी पाठविला. तदनंतर गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती

माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली. तथापि विहित मुदतीत माहिती देण्यात आली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४.०४.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०५.२००९ रोजी निर्णय देऊन सुनावणीमध्ये उर्वरित माहिती अपिलार्थीस दि. २५.०५.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते,तथापि त्यांचे श्री. कराड नावाचे अनधिकृत प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. या प्रकरणाची आज दि. २७.१०.२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे अनधिकृत प्रतिनिधी,श्री. कराड यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील त्यांना रिक्त पदाची संख्या जन माहिती अधिकाऱ्याने दिलेली नाही व तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची टिपणी मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती स्वतः तयार करुन त्यांना दिली आहे व ती दिशाभूल करणारी आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १३.०४.२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या निर्णयाचे पालन का केले नाही, अशी आयोगाने विचारणा केली असता, यासंदर्भात ते आयोगासमोर कोणताही खुलासा करु शकले नाहीत.

मागील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्राथमिक शाळा सुगाव व गाडेगाव या दोनही शाळेतील रिक्त पदांची संख्या दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मते या पदावरील शिक्षक हे दीर्घ मुदतीच्या रजेवर गेले होते. त्यामुळे ते पद रिक्त नव्हते. हे आयोग मान्य करीत आहे. या दोन शाळांपैकी एका शाळेमध्ये अपिलार्थीस नेमणूक करुन घेण्याची इच्छा असल्याने अपिलार्थीस ही माहिती कदाचित दिशाभूल करणारी असावी, असे वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रिक्त पदांची संख्या या सदराखाली फक्त, "-" असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या संदर्भात पुरविलेली माहिती बरोबर असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.५ द्वारे जिल्हा बदलाने आलेल्या शिक्षकांना पदस्थापना देताना कोणते निकष विचारात घेण्यात आले, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील टिपण मागितले होते. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकाऱ्याने असा खुलासा केला की, "जिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना पदस्थापना देण्याचे अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना आहेत. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे जिल्हा बदलीने नांदेड जिल्हयामध्ये येणाऱ्या शिक्षकांना रुजू करुन घेतले जाते." त्यासंदर्भात अधिक तपशील देताना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे दि. ०५.१२.२००८ रोजीचे आदेश जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविले. या आदेशामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियम १९६७ मधील नियम ६ च्या उपनियम ८ च्या तरतुदीनुसार त्यांनी नेमणूकीचे आदेश काढल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयात हे आदेश काढताना या विषयावरील टिपणीच्या प्रती उपलब्ध असणे आवश्यक आहे. ही माहिती मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांच्या आत या अर्जाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती देण्याचे सूचित करणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अर्थात या कार्यवाहीसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती,नांदेड हे जबाबदार असल्याचे आढळले आहे. सबब गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पाठवावी.

उपरोक्त प्रकरणी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या आदेशावर कार्यवाही केलेली नाही, याबाबत त्यांचा खुलासा मागवून त्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यांनी करावी, असे आयोग सूचवित आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणीही उपस्थित नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,नांदेड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**

**दिनांक : २७.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सूर्यकांत टी. पंचलीगे,रा.नारायण पॅलेस सबोरी फर्निचरजवळ, मालेगाव रोड,तरोडा (खु.) ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२५
सुनावणी दिनांक : २७.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राठोड संतोष धुपसिंग,<br>रा.तोटंबा, ता.किनवट,जि.नांदेड | : अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, मानसिंग नाईक तांडा<br>(तोटंबा),ता.किनवट, जि.नांदेड | : प्रतिवादी | : अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा,<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,किनवट,<br>जि. नांदेड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०७.२००९ रोजी दिलेला निर्णय त्यांना प्राप्त झाला नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००३ ते दि. १०.०५.२००९ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत मानसिंग नाईक तांडा येथे योजनानिहाय मंजूर कामाकरिता प्राप्त

झालेला कामनिहाय निधी व झालेला खर्च व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील लोकसहभागामधील केलेल्या कामाची माहिती आणि आर्थिक व्यवहाराचा वर्षनिहाय एकूण केलेला खर्च,एकूण जमा रक्कम ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८.०६.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. या प्रकरणात आज दि. २७.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली आहे. यासंदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सबळ पुरावा व त्यांनी निश्चितपणे अपिलार्थीस कोणती माहिती पुरविली आहे,याबाबत विचारणा केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर त्यांच्या, अपिलार्थीस माहिती पुरविल्याच्या विधानापृष्ठयर्थ कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत अथवा दिलेली माहिती आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता व या प्रकरणातील त्यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आयोगाने त्यांना पुरेपूर संधी देऊनही जन माहिती अधिकारी हे आयोगास अपिलार्थीस माहिती न देण्यासाठीचे कोणतेही समर्थन करु शकले नाहीत.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या अर्जाच्या संदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व, संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, किनवट यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ०१.०७.२००९ व दि. ०९.०७.२००९ रोजीच्या पत्रावरुन योग्यप्रकारे पार पाडल्याचे सिध्द होत आहे. सदरची पत्रे पंचायत समिती किनवटमध्ये प्राप्त झाल्याची पोच पंचायत समितीच्या लिपीकाने त्यांच्या सही व शिक्क्यासह अपिलार्थीस दिली आहे. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहितीसाठी सतत पाठपुरावा केल्याचे सिध्द होत आहे. तथापि एवढे असूनही आजतागायत म्हणजे अंदाजे एक वर्षाचा कालावधी ओलांडून केल्यानंतरही अपिलार्थीस माहिती दिल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर करु शकत नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता द्यावी लागेल. सदर माहिती सशुल्क देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रमामध्ये आयोगाच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात आयोगाने असे अभिप्राय दिले आहेत की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०७.२००९ रोजी

आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकाऱ्याने, जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश निर्गमित होऊनही माहिती प्राप्त न झाल्याची बाब त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मर्यादित होते. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत माहिती पुरविली नाही व त्यांच्या या कृतीचे समर्थन ते आयोगासमोर आज रोजी करु शकत नाहीत. अशा परिस्थितीत ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ लेखी स्वरुपात आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राठोड संतोष धुपसिंग,रा.तोटंबा, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,तोटंबा, मानसिंग नाईक तांडा,ता.किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०५

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,<br>रा. ५-११-२०, पदमपुरा, रामदेवनगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक पोलीस आयुक्त (छावणी विभाग),<br>पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, एम. आय. डी.सी<br>एरिया, पंढरपूर, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पोलीस<br>आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (शहर) | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सहायक पोलीस आयुक्त, छावणी विभाग, औरंगाबाद (शहर) | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २२-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी हजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने चार अर्ज केले होते. त्यापैकी एक अर्ज दिवाणी स्वरुपाचा होता त्यामुळे आपण न्यायालयात दाद मागावी असे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. बाकी तीन अर्ज रेकॉर्डवर उपलब्ध नाहीत. अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांनी जे अर्ज दिले होते त्यावर कार्यवाही झालेली नाही, ते अर्ज त्यांनी गहाळ केले आहेत, तसेच याबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

प्रकरणात दिनांक २२-०६-२०१० रोजी घेतलेली सुनावणी, आज रोजीच्या सुनावणीमध्ये सर्व संबंधितांनी मांडलेले त्यांचे म्हणणे आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी एक

महिन्याच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः माहिती द्यावी. याबाबत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, औरंगाबाद (शहर) यांनी व्यक्तिश: लक्ष द्यावे व जन माहिती अधिकारी त्याप्रमाणे कार्यवाही करतील असे पहावे. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी या प्रकरणी सदर अर्ज खरोखरीच गहाळ झाले आहेत किंवा कसे याची चौकशी करुन आवश्यकता भासल्यास संबधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः द्यावी.

२. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी या प्रकरणाशी संबंधित अर्ज खरोखरच गहाळ झाले आहेत किंवा कसे याची चौकशी करुन आवश्यकता भासल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, रा. ५-११-२०, पदमपुरा, रामदेवनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, छावणी विभाग, औरंगाबाद (शहर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०७

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिंदे शेषराव वामन,<br>मु. पो. जेवरी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | समाज कल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २२-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगास सांगितले. प्रकरणात दिनांक २२-०६-२०१० रोजी घेतलेली सुनावणी, त्यावेळी सुनावणीमध्ये सर्व संबंधितांनी मांडलेले त्यांचे म्हणणे आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही त्यांच्या अर्जातील माहितीपेक्षा पूर्णतः वेगळी व दिशाभूल करणारी दिली आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. सचिव (सामाजिक न्याय), मुंबई यांना या

प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२. सचिव (सामाजिक न्याय), मुंबई यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंदे शेषराव वामन, मु. पो. जेवरी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०८

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कांबळे रमेश पुंडलिक,<br>व्दारा डॉ. एस. पी. पैठण, लक्ष्मी निवास, लोकमान्य नगर परभणी. | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्र.जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | कक्ष अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद,नांदेड | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २२-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर होते व जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते.

आयोगाच्या मागील दिनांक २२-०६-२०१० रोजीच्या सुनावणी संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन करता आयोगाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ शी संबंधित माहिती त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले होते. कारण की एकूण ८ मुद्दयांपैकी ६ मुद्दयांबाबत अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे. त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीस दिनांक ११-१०-२०१० रोजी माहिती पाठविल्याचे व तसेच ती अपिलार्थीस दिनांक २५-१०-२०१० रोजी प्राप्त

झाल्याचे सांगितले तसेच पुराव्यादाखल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेल्या पत्राची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे.

वरील बाबी विचारात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २७-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांबळे रमेश पुंडलिक, व्दारा डॉ. एस. पी. पैठण, लक्ष्मी निवास, लोकमान्य नगर परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०९

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. कुरेशी शे. जहीर अहमद शे. इस्माईल,<br>रा. पोस्ट ऑफिससमोर, जाफ्राबाद, तालुका<br>जाफ्राबाद, जिल्हा जालना. | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, आयेशा ऊर्दू हायस्कूल, टेंभुर्णी,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | प्रतिवादी : | प्रतिनिधी-<br>ॲड एम.<br>एम. शेख-<br>उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>जालना | | : | अनुपस्थित |

त्रयस्थ पक्ष : श्री. अलजिलानी हबीब ऐदरुस हामेद, : अनुपस्थित
श्री. शे. जहीर लजिल अ.शे.इस्माईल. : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील सहशिक्षक श्री. अलजिलानी हबीब ऐदरुस हामेद व श्री. शे. जहीर अ.शे.इस्माईल यांच्या व शाळेच्या संदर्भात एकूण अकरा मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०६.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०७.२००९ रोजी निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते व जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २७-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद केला.अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात कधी संपर्क साधला होता या संदर्भात आयोगाने अपिलार्थीकडे सबळ पुरावा मागितला असता, अपिलार्थीने असा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले व आयोगास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे शपथपत्र सादर केले.

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मुख्यत्त्वेकरुन माहिती मागितली असली तरीही या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत नसावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत सशुल्क व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १४० पानांची माहिती दिनांक ०१-०५-२००८ रोजी दिलेली आहे. तथापि ही बाब दिनांक २२-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाच्या नजरेस आणून देण्यात आली नव्हती. सदर पत्र रेकॉर्डवर घेण्यात आले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुन्हा सशुल्क माहिती देण्यास हरकत नसावी असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे होणारे शुल्क अपिलार्थीस कळवावे व अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २७-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कुरेशी शे. जहीर अहमद शे. इस्माईल, रा. पोस्ट ऑफिससमोर, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आयेशा ऊर्दू हायस्कुल, टेंभुर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१०

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. किशनराव अप्पाराव सुगावे,<br>मु. पो. घुंगराळा, तालुका नायगाव खै.,जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, नायगाव (खै.), नांदेड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, नायगांव, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये,जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, नायगाव (खै.) या कार्यालयामध्ये ग्राम पंचायत,मौ.घुंगराळा येथील पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विहिरीच्या खोदकामापृष्ठ्यर्थ अंदाजपत्रकाची रक्कम व खर्च, त्या लगत झालेल्या बंधाऱ्याचे काम साधे आहे की सिमेंट कॉंक्रीटचे आहे, विहीर बांधकाम व पाईपलाईन बंधारा आणि सर्व कामांची संख्या, तपशीलवार अंदाजपत्रक, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रथमतः ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या पाणीपुरवठा समितीकडे होती, त्या समितीच्या अध्यक्षांना त्यांच्या दि. २५.०५.२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित केले व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. १९.०६.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग नायगाव (खै) यांना त्यांच्या दिनांक- ०७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे परिपूर्ण माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. सदर प्रत अपिलार्थीस अग्रेषित करताना कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती नायगाव उपविभागाकडून हस्तगत करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि.२७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई का केली नाही, असे स्पष्टीकरण त्यांच्याकडून मागितले व उपअभियंत्यावर दंडात्मक कारवाई करावी अन्यथा ते पुढील अपील करतील, असे कळविले व तदनंतर वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २२.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती त्यावेळी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. आज दिनांक २७-१०-२०१० रोजी सदर प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित उपअभियंत्यावर शास्तीची कारवाई करण्याची मागणी केली.

संबंधित उप विभागीय अभियंता यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले तरीही अपिलार्थीने त्यांच्याकडून माहिती हस्तगत करुन न घेतल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही. या संदर्भातील आवश्यक तो पुरावा संबंधित उप विभागीय अभियंता हे आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. २४.०७.२००९ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस संबंधित ग्रामपंचायतीकडून माहिती हस्तगत करुन घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी सोबत आणलेली असून ते अपिलार्थीस ती त्वरित देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील पाणीपुरवठा योजनेच्या बंधाऱ्याचे काम सिमेंटचे आहे की साधे आहे, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. मात्र त्यांच्या

अर्जातील उर्वरित माहिती, 'विहिरींच्या खोदकामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम व खर्च आणि पाणीपुरवठा योजनेमध्ये येणारी सर्व कामे' ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी या दोन मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाचे वेळी संबंधित उपअभियंता यांना शास्ती लावावी, असे आग्रही प्रतिपादन आयोगासमोर केले. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, मूळात अपिलार्थीने ज्या योजनेसंदर्भात माहिती मागविली आहे ती योजना शासनाच्या विकास कामांच्या नियमित स्वरुपाच्या योजनांसारखी नसून, या योजनेची माहिती संबंधित गावाच्या पाणीपुरवठा समितीने जतन करुन ठेवावयाची आहे. ही समिती स्थानिक ग्रामस्थांनी मिळून तयार करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष व सचिव देखील ग्रामस्थांनी निवडून द्यावयाचे आहेत. या योजनेवर संबंधित उपअभियंता यांचे तांत्रिक मार्गदर्शनाशिवाय इतर कोणतेही नियंत्रण नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना संबंधित समितीवरच अवलंबून राहणे भाग होते. ही समिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना संबंधित समितीचे सहाय्य घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्यांनी संबंधित समितीचे सहाय्य घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे संकलीत करुन ठेवली आहे. या प्रकरणी मूळात संबंधित उपविभागीय अभियंता नायगाव (खै.) हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई आयोगास करता येणार नाही.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर तसेच कागदपत्रावर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २७-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशनराव अप्पाराव सुगावे, मु. पो. घुंगराळा, तालुका नायगाव खै.,जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग नायगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४११

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोविंद नामदेव जाधव,<br>व्यंकटेश नगर, रोड नं. ०१, अंबाजोगाई रोड,<br>तालुका जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २२-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात दिनांक २२-०६-२०१० रोजी घेण्यात आलेली सुनावणी, आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज शासन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ द्वारे प्रसिध्द केलेल्या विहित प्रपत्राच्या नमुन्यात नाही. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांनी या प्रकरणी मागितलेली माहिती त्यांना दि. १९.०२.२००९ रोजी त्यांच्या वेगळया अर्जासंदर्भात प्राप्त झाली असल्याचे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तीस दिवसांच्या आत निर्णय न दिल्याने अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०६.२००९

रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती देय माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २७-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद नामदेव जाधव, व्यंकटेश नगर, रोड नं. ०१, अंबाजोगाई रोड, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१२

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दौलत गमाजी भिसे,<br>सहायक पोलीस उप निरीक्षक, निवास क्रमांक<br>२५८, पोलीस लाईन, बालेपीर, बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र<br>पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र<br>पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांच्या दिनांक १८-०६-२००८ व दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०१-०१-२००६ ते दिनांक ०९-०५-२००९ या कालावधीमध्ये एस. सी. ची किती प्रकरणे जात पडताळणीसाठी प्राप्त झाली, त्यापैकी किती प्रकरणे निकाली काढली व किती प्रकरणे प्रलंबीत आहेत, अशी माहिती मुद्देनिहाय मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागविताना त्यांना अपेक्षित माहिती त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिलेली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी उपस्थित होते. या प्रकरणाची आज दिनांक २७-१०-२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, त्यांच्या मुलीला " महार " जातीचे प्रमाणपत्र समिती-कडून प्राप्त होऊनही त्यांना मात्र त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र आजतागायत प्राप्त होऊ शकले नाही. यासंदर्भात आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेली आहेत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित अशी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. तथापि एवढे असूनही अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व त्यावरील अपिलाची संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी एक प्रकारे अवहेलना केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती म्हणजे, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या दिनांक १८-०६-२००८ व १७-०१-२००९ रोजीच्या पत्राच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावरील त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध टिपणीच्या प्रती किंवा जर त्यांनी या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तसे कळविणे ही होय. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दुस-या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही स्वंयस्पष्ट आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब सचिव (सामाजिक न्याय)

यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद (दिनांक ०९-०५-२००९ रोजी व तदनंतर ३० दिवसा-पर्यंतच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रकरणात दिनांक २२-०६-२०१० रोजी घेण्यात आलेली सुनावणी, आज रोजी घेण्यात आलेली सुनावणी व आयोगाच्या निदर्शनास आलेल्या गोष्टी आणि उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद (दिनांक ०९-०५-२००९ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंतच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्या-वर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दौलत गमाजी भिसे, सहायक पोलीस उप निरीक्षक, निवास क्रमांक २५८, पोलीस लाईन बालेपिर, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१३

सुनावणी दिनांक २७-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश साहेबराव लांडगे,<br>पंचशिलनगर, (मंजरथ रोड), माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा फलोत्पादन अधिकारी, तालुका फलरोप वाटिका, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | प्रतिवादी : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००९ रोजी प्रथम अपील दाखल करुनही त्यांनी या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००८-०९ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या पाचही मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांना वेगवेगळ्या लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेल्या अनुदानाची व त्यावरील खर्चाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांनी खर्चाचा तपशील व हिशोब अशा स्वरुपाची माहिती मागविल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित फलोत्पादन अधिकारी, तालुका फळरोपवाटिका, माजलगाव यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १५-०८-२००९ रोजीचे पत्र फलोत्पादन अधिकारी, तालुका फळरोपवाटिका, माजलगाव यांना उद्देशून लिहिलेले आहे. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रकरणाची आज दिनांक २७-१०-२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्याकडे न आल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस देणे भाग आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठीची त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास दाखविली. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या खर्चाचा तपशील व हिशोब या माहितीचा त्यामध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आयोगास दाखविलेल्या माहितीबरोबरच त्यांच्याकडील सन २००८-०९ या कालावधीतील सदर योजनांवर त्यांनी केलेल्या खर्चाचा तपशील त्यांच्याकडे ज्या कॅशबुकमध्ये लिहिलेला आहे त्या कॅशबुकच्या प्रती, या माहितीबरोबर अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने खर्चाचा हिशोब व पावत्या अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि सदरची कागदपत्रे मूळ प्रतीत जन माहिती अधिकारी यांनी महालेखापाल यांच्या कार्यालयाला त्यांच्या नियमित लेख्याबरोबर सादर केली असल्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता मिळू शकणार नाही. या खर्चाची बाबनिहाय नोंद असलेल्या कॅशबुकाच्या प्रती अपिलार्थीस मिळू शकतील. त्यामुळे अपिलार्थीस कॅशबुकच्या प्रती

देण्याचे सूचित केले. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले होते अशी आयोगाने विचारणा केली असता, यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीस आयोगास दाखवता आला नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग मान्य करीत नाही.

प्रकरणात आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती पाठविली होती. मात्र सदर पाठविलेल्या माहितीचे बंद पाकीट परत आले. अपिलार्थीस पुन्हा एकदा संधी देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागील सुनावणीच्या वेळी स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २७-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशिलनगर, (मंजरथ रोड), माजलगाव, तालुका

माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका फलोत्पादन अधिकारी, तालुका फलरोप वाटिका कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३४

सुनावणी दिनांक : २८.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वसंतराव मारुती जोगदंड,<br>रा. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : प्रतिवादी | : अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०७.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, गट विकास अधिकाऱ्याने ग्रामसेवकाची खोटी माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बर्दापूर ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी सन २००८-०९ च्या

घरकुलामध्ये ज्यांचे प्रतिक्षा यादीमध्ये ६, ७, ८ व ९ गुण होते ते सोडून ज्यांचे गुण १० होते अशा लाभधारकाला लाभ कसा मिळाला व डबल घरकूल कसे दिले, याची माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिनांक २७.०५.२००९ रोजी पारीत केला. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. सदर प्रकरणात आज रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १२.०५.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती माहिती स्वीकारण्याचे नाकारले. यानंतर त्यांनी परत त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिनांक २२.०५.२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना व्यक्तिशः देऊ केली असता त्यावेळी देखील अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती केव्हाही विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने पोस्टाने माहिती मागविली असता त्यांना व्यक्तिशः माहिती देण्याचे काय प्रयोजन आहे असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आयोगास सादर केला. या अर्जामध्ये अपिलार्थीने

त्यांना व्यक्तिशः माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले होते. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्याची केलेली त्यांची कृती बरोबर असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०५.२००९ रोजी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता यासंदर्भात आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न करुन घेता आयोगाकडे गट विकास अधिका-याने त्यांना खोटी माहिती दिल्याकारणाने द्वितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तथापि मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीच प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याचे प्रयोजन व तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती मागवूनही आयोगाकडे त्यांच्या मूळ अर्जाची प्रत सादर करताना त्यामध्ये खाडाखोड करुन त्यांना पोस्टाने ही माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या वर्तनाची अशा प्रकारची विसंगती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला होता.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे मागील सुनावणीचे वेळी आयोगामार्फत काढण्यात आलेले निष्कर्ष अंतिम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंतराव मारुती जोगदंड, रा. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३५
सुनावणी दिनांक : २८.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शे. शब्बीर शे. मियॉभाई<br>मुखत्यारआम श्रीमती सायराबी शब्बीर,<br>रा. पाचेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : प्रतिवादी | : अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>बीड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०७.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती पुरविली असून, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता सुनावणीसाठी अपिलीय अधिकारी गैरहजर राहिले आणि अपिलीय अधिका-याने दिलेल्या चौकशीचा अहवाल ८ दिवसाच्या आत न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे पाचेगाव, तालुका गेवराई, जिल्हा बीड येथील इंदिरा आवास योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या नवीन घरकूल मंजूरीबाबत काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - इंदिरा आवास योजनेअंतर्गत नवीन घरकुले मंजूर झालेल्या लाभार्थींची यादी, दारिद्र्यरेषेखालील किती कुटूबांना घरकुले मंजूर झाली त्याची यादी व त्यातील किती लोकांना हप्ते वाटप करण्यात आले त्याची यादी व वाटप केलेल्या धनादेशाच्या प्रमाणित नकला आणि उर्वरित वाटपाची रक्कम - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत व शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक २५.०४.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०६.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिका-याने अपिलार्थीने या सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे उपस्थित केलेल्या मुद्दयावर भाष्य करुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांना अपिलार्थीस मंजूर करण्यात आलेले घरकूल दुस-यास देण्यात आले या विषयी अपिलार्थीच्या तक्रारीवर ८ दिवसाच्या आत चौकशी करुन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांच्याकडे अहवाल सादर करण्याचे सूचित केले.या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचे कोणतेही आदेश नाहीत. यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल अपिलार्थीस प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व तत्कालीन आणि सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित होते. आज दि. २८.१०.२०१० रोजी प्रकरणात पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६.०४.२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे विनामूल्य पुरविली आहे. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या घरकूल वाटपासंदर्भात उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचे निराकरण झाले असून अपिलार्थीच्या नावाने मंजूर झालेले घरकूल ज्या व्यक्तीस वाटप झाले होते ते आदेश रद्द करुन अपिलार्थीस घरकूल मंजूर करण्यात येऊन आतापर्यंत एकूण २८,५०० रुपये इतक्या रकमेपैकी २०,००० रुपये इतकी रक्कम अदा केली आहे व अपिलार्थीने घरकुलाचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर उर्वरित ८,५०० रुपये इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात येईल.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस आता कोणतीही माहिती प्राप्त होणे बाकी नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. आयोगाकडील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकाऱ्याने केलेल्या चौकशीचा अहवाल त्यांच्या वरिष्ठांकडे ८ दिवसाच्या आत सादर केला नाही त्यामुळे

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीच्या या माहितीचा माहिती अधिकारामधील त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी कुठलाही संबंध नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी चौकशीचा अहवाल अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचितही केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे द्वितीय अपील करताना दिलेली सर्व कारणे येथे गैरलागू असल्याचे सिध्द होत असल्याने आणि विशेषतः अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याने आणि अपिलार्थीच्या सर्व समस्यांचे आता निराकरण झाले असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आयोगाने पूर्वी काढलेले निष्कर्ष अंतीम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शे. शब्बीर शे. मियॉभाई मुखत्यारआम श्रीमती सायराबी शब्बीर, रा. पाचेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८१

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सोनटक्के शिवजी त्र्यंबकराव,<br>मु. पो. लोहारा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपिलासंदर्भात दिनांक १६-०२-२००९ रोजी सुनावणी ठेवल्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे पत्र त्यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी पोस्टात टाकले व अपिलार्थीस ते त्याच दिवशी मिळाले. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली नाही व त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकाऱ्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतूदीप्रमाणे शास्ती लावावी. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली होती.

जन माहिती अधिकारी यांनी मागील सुनावणीच्या वेळी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २३-०६-२०१० रोजीचे एक पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी तालुका कृषि अधिकारी, उदगीर या कार्यालयात दिनांक २३-०६-२०१० रोजी समक्ष उपस्थित राहून त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे निरीक्षण केले व या निरीक्षणाने त्यांचे समाधान झाले असून, या बाबत त्यांची आता कोणतीही

तक्रार नाही किंवा त्यांना लेखी माहितीची आवश्यकता नाही, त्यामुळे त्यांचे प्रकरण निकाली काढावे, अशी आयोगास त्यांनी या पत्राच्या अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील लोहारा येथील कृषि विभागामार्फत केलेल्या कामाच्या संदर्भात काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी, उदगीर यांना उद्देशून दिनांक ०२-०१-२००९ रोजी एक पत्र लिहिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी, ते रक्कम भरण्यास तयार आहेत. परंतु अद्यापपावेतो त्यांना माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कधीही कळविले नाही, असे नमूद केले आहे. सदरचे पत्र तालुका कृषि अधिकारी, उदगीर यांच्या कार्यालयात दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्राप्त झाले आहे. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १९-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीचे वर्तन आयोगास आक्षेपार्ह आढळून आले आहे. त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजी अपिलीय अधिकाऱ्यास उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये ते माहितीसाठीचे शुल्क भरण्यास तयार आहे, असे अवगत केले व आयोगाकडील द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे जन माहिती अधिकाऱ्याकडे पत्र दिले आहे. अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती मागविली होती. तथापि नंतर केवळ माहिती पाहण्यावरच त्यांनी समाधान मानले यावरुन अपिलार्थीस या प्रकरणी खरोखरीच माहितीची आवश्यकता होती किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या विसंगत वर्तणुकीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रावर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोनटक्के शिवजी त्र्यंबकराव, मु. पो. लोहारा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१०
सुनावणी दिनांकः २८.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. केंद्रे पी. पी.<br>आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, अहमदपूर,<br>जि. लातूर | : अपिलार्थी | :अनुपस्थित |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : प्रतिवादी | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री. जे.एस.वीर, वैद्यकीय अधिकारी) |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | | :उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री. एस.ए.अकेले, सहायक प्रकल्प अधिकारी (उद्योग) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, भविष्य निर्वाह निधी वर्ग E-892 वरुन जिल्हा परिषद, लातूर LTR/PH/1082 कडे वर्ग भविष्य निर्वाह निधी प्रस्ताव दाखल केल्यापासून भविष्य निर्वाह निधी लातूर जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्यापर्यंतच्या कालावधीतील विषयावरील संचिका व टिपणीच्या प्रती व अंतिम आदेश, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले होते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली नाही. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या बरोबर आणली असून, ते अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य देण्यास तयार आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, दि. १४.१०.२०१० रोजी माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित असल्यामुळे त्यास पुष्टी मिळत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची कागदपत्रे आयोगास सादर केली, यामध्ये अपिलार्थीने मूळ अर्जात संदर्भित केलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध नसल्याचे तथापि जन माहिती अधिकारी यांच्या नस्तीमध्ये उपलब्ध असल्याचे आयोगाचे निदर्शनास आले. या आदेशाची प्रत अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी, असे आयोगाने आज जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व जन माहिती अधिकारी यांनी त्या आदेशाची प्रत अपिलार्थीस पाठविण्याचे आयोगासमोर कबूल केले.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची आणि त्यावरील अपील अर्जाची जन माहिती व अपिलीय अधिकाऱ्याने अवहेलना करुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे आणि ती त्यांच्या स्वतः विषयाचीच असल्यामुळे, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित मुदतीमध्ये प्रतिसाद देण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. परंतु केवळ मनातील इच्छा शक्तीच्या अभावामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अद्यापपावेतो पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे व तसेच आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. अशा सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सध्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या आदेशाची प्रत अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीन दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

८. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या आदेशाची प्रत त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीन दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पुरवावी.

९. सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक : २८.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केंद्रे पी. पी., आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, अहमदपूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३११
सुनावणी दिनांक : २८.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जायभाये दत्ता संभाजीराव,<br>रा. दत्तनगर, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड | : अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आंजी,<br>पांधरा, ता. किनवट, जि. नांदेड | : प्रतिवादी | : अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>किनवट,जि. नांदेड | | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील हरियाली योजनेअंतर्गत झालेल्या कामाच्या संदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या योजनेअंतर्गत मौजे आंजी, पांधरा येथे आलेला निधी, झालेला खर्च, ज्या कामावर खर्च करण्यात आला त्या कामाचे नाव, कामाचा प्रकार व मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती व छायांकित प्रती, लेखा परीक्षण कोणत्या वर्षी करण्यात आले, ते अहवाल,सदर योजनेची पाहणी करणाऱ्या अभियंत्याचे नाव, गावनिहाय मजूर हजेरीपत्रक आणि योजना कोणत्या टप्प्यावर आहे तो टप्पा - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०८.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेश दिले. तदनंतर संबंधित ग्रामसेवक अपिलार्थीकडे दिनांक ०४.०८.२००९ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती घेऊन गेले असता, अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः घेण्याचे नाकारले. त्यामुळे ग्रामसेवकाने सदरची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस दिनांक ०५.०८.२००९ रोजी पाठविली असता, ही माहिती घेण्याचे देखील अपिलार्थीने नाकारले व वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दि. २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळात व्यक्तिशः मागितली होती. त्यामुळे अपिलार्थी त्यांच्याकडे येऊन ही माहिती घेऊन जातील या अपेक्षेने त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तयार करुन ठेवली होती. तथापि ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्याकडे कधीही आले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती स्वतः देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्यास नाकारले म्हणून त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली. परंतु अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाद्वारे देखील माहिती घेण्याचे नाकारले आणि आयोगाकडे आज रोजीचे अपील सादर केले आहे. आयोगाकडे अपील सादर केल्यानंतर अपिलार्थीने स्वतः ग्रामसेवकाशी संपर्क साधून ही माहिती त्यांच्याकडून घेऊन गेले आहेत. या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक २६.०४.२०१० रोजी प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे

अथवा त्यांनी सादर केलेल्या पत्राचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नव्हते व आज रोजी देखील ते उपस्थित नाहीत.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही गेले नाहीत. एवढेच नव्हे तर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेली माहिती स्वीकारण्याचे देखील अपिलार्थीने नाकारले आणि आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले. यानंतर दि. २६.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीने लेखी कबूली दिली. अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या विसंगत वर्तणूकीमुळे व अपिलार्थीने माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला होता. आयोगाचे सदर निष्कर्ष अंतिम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जायभाये दत्ता संभाजीराव, रा. दत्तनगर, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आंजी, पांधरा, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१४

सुनावणी दिनांक : २८.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग निवृत्ती मोने,<br>अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद | : | प्रतिवादी | : अनुपस्थित |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | | | : अनुपस्थित |

त्रयस्थ पक्ष : श्री. रमेश भाऊराव इंगळे (तलाठी,सजा रांजणगांव) : अनुपस्थित

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष,श्री. रमेश भाऊराव इंगळे,तलाठी सजा रांजणगाव (सध्या

सजा आडुळ) यांचे भिल्ल जातीचे प्रमाणपत्र, या विषयावर सह आयुक्त तथा समिती उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांच्या दि. २९.०९.२००८ च्या पत्राच्या अनुषंगाने पाठविलेल्या अहवालाची नक्कल - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२००९ रोजी निर्णय देऊन सुनावणीच्या वेळी, "त्रयस्थ पक्षाने सादर केलेल्या त्यांच्या दि. २२.०७.२००९ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने समितीस त्यांचे पत्र दि. २९.०९.२००८ च्या उत्तरी कळवावे"असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले व तसेच या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्याचे आदेश देखील जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास दिले. यानंतर संबंधितांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेचे पालन करुन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती समाधानकारक नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दि. २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे आणि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविली आहे. जन अपिलीय

अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे देखील जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. परंतु ही माहिती अपिलार्थीस समाधानकारक नाही, असे वाटत आहे.

अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीतील कोणत्या मुद्यावर त्यांचे समाधान झाले नाही, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही किंवा त्यांचा मुद्दा तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाही. जन माहिती अधिकाऱ्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा आयोगाने यापूर्वी काढलेला निष्कर्ष कायम करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्ती मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१५
सुनावणी दिनांकः २८.१०.२०१०

१ श्री. स. नुरअली स. बाखर अली, : अपिलार्थी :अनुपस्थित
रा. कुबर कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी :उपस्थित
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील
कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी :अनुपस्थित
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. शे. अफसर शे. बाबु :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०८.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना त्रयस्थ पक्ष श्री. शे. अफसर शे. बाबु यांच्या दिनांक ०५.०३.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवाल अपर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २४.०३.२००८ पर्यंत मागितला होता, त्या अहवालाची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित

केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते आणि जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याविषयी कळवूनही ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास ते कधीही तयार आहेत. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. म्हणून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

वरील दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद**

**दिनांक २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. स. नुरअली स. बाखर अली, रा. कुबर कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१६

सुनावणी दिनांक : २८-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र हौसराव देशमुख,<br>कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,<br>गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,<br>गेवराई, जिल्हा बीड | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड : उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ऑगस्ट २००८ ते ३१.१२.२००८ या कालावधीतील पाणी तपासणी अहवाल नमुने, गुत्तेदारी कर्मचारी घेणे संदर्भातील दिनांक एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००९ पर्यंतच्या कालावधीतील निविदा संचिकांच्या प्रती, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना बूट चप्पल घेण्यासाठी काढलेल्या निविदा व देयकाच्या एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००९ पर्यंतच्या संपूर्ण निविदा बिलाच्या व आदेशाच्या प्रती आणि त्रयस्थ पक्ष श्री. ए. एस. काळे यांच्या ऑगस्ट २००८ ते डिसेंबर २००८ च्या पगार बिलाचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०७.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०७.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३.०६.२००९, २५.०६.२००९ व ३०.०६.२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांवरील माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ

पोस्टींगद्वारे विनामूल्य दिली असल्याचे आयोगास अवगत केले.  त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आवश्यक तो सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार देय होत आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे.  तसेच अपिलार्थीस माहिती पुरविल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सबळ पुरावा दाखल केला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जर आजही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रतिपृष्ठ दोन रुपये याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.  त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात आले होते की, जर त्यांना आजही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क प्राप्त करुन घ्यावी.  अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसांच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्यास ते तयार असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या

दृष्टीने  जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस या प्रकरणी देय होत असलेली संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनाशुल्क पाठवावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे  खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक :     २८.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१७

सुनावणी दिनांक : २८.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. एस. पी. नैण,<br>व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला<br>सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या<br>पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड | : अपिलार्थी | : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील<br>कार्यालय, परभणी | : प्रतिवादी | :उपस्थित<br>(प्रतिनिधी -<br>श्री.पी.व्ही.आष्टीकर,<br>ना.त.सं.गां.नि.यो.) |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | | : अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : श्री. पुर्णे विष्णू सखारामजी | | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०५.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दि. २८.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. आज सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी

अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष श्री. पुर्णे विष्णू सखारामजी उपस्थित आहेत.

आयोगासमोर संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. सबब या प्रकरणाची आज रोजीची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २८.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२६

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कादरी सै. फारुक आलम सै. नुरुद्दीन, हॉशमीयाँ मोहल्ला, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी : | लिपीक, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | : उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : | री. सै. नुरुद्दीन सै. आलम कादरी | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील घर क्रमांक १०६५ च्या संदर्भात काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिका-याने वक्फ ट्रिब्युनल, औरंगाबाद यांनी निर्णय देऊनही रिव्हीजन रजिस्टरला 'हॉशमीयाँ मस्जीदीचे दुकान' अशी चुकीची नोंद कोणत्या आधारे घेतली आहे त्या पुराव्याची प्रत, परतूर नगर परिषद हद्दीमध्ये त्रयस्थ पक्ष सै. नुरुद्दीन सै. आलम यांच्या नावाने किती मिळकत आहे, त्यांचे घर क्रमांक व मिळकतीच्या चतु:सीमा व मिळकत विभागातील अभिलेख्याच्या नोंदी शासन राजपत्र १९७४ हे नगर परिषदेला लागू आहे किंवा नाही ? जर लागू असेल तर त्याच्या नोंदी का ग्राह्य धरत नाही आणि घर क्रमांक ७७० वर दिनांक २३-०८-१९७६ ला बांधकाम परवानगीसाठी दाखल

केलेल्या संपूर्ण प्रस्तावाच्या व नगर परिषदेने दिलेल्या बांधकामाच्या परवानगीच्या पत्राची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: त्यांच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि यानंतरही त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीबद्दल आयोगाने नाराजी व्यक्त केली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व येत्या ३० दिवसाच्या आत ही माहिती शोधून ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ४ मुद्दयांवरील माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेली माहितीच अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतपत या अधिनियमामध्ये प्रक्रिया सीमित आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती देय होत नाही. उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ च्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयात कसोशीने घेऊन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्याच्या प्रवर्गातील आहे असे आढळून येत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही परिस्थितीत या कालावधीमध्ये उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अन्यथा ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याची होती अथवा आहे त्या कर्मचा-यावर त्यांनी फौजदारी गुन्हा दाखल करुन त्याची प्रत अपिलार्थीस त्याच कालावधीमध्ये पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस माहिती मिळेल असे व्यक्तिशः पहावे व तसेच याबाबत एका जबाबदार अधिका-याची (अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिका-याची) नेमणूक करुन चौकशी करावी आणि माहिती गहाळ झाली असल्यास संबंधितांवर फौजदारी किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस माहिती मिळेल असे पहावे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कादरी सै. फारुक आलम सै. नुरुद्दीन, हॉशमीयाँ मोहल्ला, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२७

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

१ श्री. रत्नाकर पंडितराव भवर, : अपिलार्थी : अनुपस्थित
रा. जामठी खु. पो. भांडेगांव, तालुका जिल्हा
हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी : अनुपस्थित
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : अनुपस्थित
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली

त्रयस्थ पक्ष : श्री. प्रल्हाद मोगले : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आतापर्यंत त्यांना माहिती न पुरवून कर्तव्यात कसूर केल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. प्रल्हाद मोगले यांचे स्वस्त धान्य दुकान रद्द झाले होते काय ? सद्यस्थितीत जामठी येथील स्वस्त धान्य दुकान कोणाकडे आहे ? श्री. प्रल्हाद मोगले यांनी मागील दोन वर्षात रॉकेल व स्वस्त धान्य दुकानाचा माल कोणास व कधी वाटप केला त्याचा संपूर्ण छायांकीत पुरावा व सदरील दुकानाची चौकशी झाली काय ? झाली असल्यास काय कार्यवाही केली ? काहीच कार्यवाही केली नसल्यास कार्यवाही का करण्यात आली नाही, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे व खरी माहिती दडवून ठेवल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-

११-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित दुकानदाराकडून प्राप्त करुन घेऊन १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी सौ. विमल राघव भालेराव यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४,००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे त्या अपिलार्थीस सदरची माहिती उपलब्ध करुन देऊ शकल्या नाहीत. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व मुद्दा क्रमांक ४ मधील सदरील दुकानाची चौकशी झाली काय, काहीच कार्यवाही केली नसल्यास कार्यवाही का करण्यात आली नाही या मुद्दा क्रमांक ४ मधील भागावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मात्र या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक २, ३ आणि ४ मधील चौकशी अहवालाची प्रत ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती ही संबंधित स्वस्त धान्य दुकानदार त्रयस्थ पक्ष श्री. प्रल्हाद मोगले, जामठी यांच्याकडे उपलब्ध आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तहसीलदार, हिंगोली यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या आणि दिनांक २३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे श्री. प्रल्हाद मोगले यांच्याकडे पाठपुरावा केल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिका-यास माहिती देण्यासाठी श्री. प्रल्हाद मोगले यांनी त्यांच्या दिनांक २२-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे या कामासाठी त्यांना ४,००० रुपये इतका खर्च लागणार असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न

केल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असमर्थता व्यक्त केली. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे संबंधित अर्जदाराचे असते. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती ही जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठविणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे गरजेचे होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना या दुकानाच्या चौकशी अहवालाची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. एकंदरीत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नसल्यामुळे त्यांना ती प्राप्त होऊ शकली नाही आणि मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे या मुद्दयावरील माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. असे जरी असले तरी या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी श्री. प्रल्हाद मोगले यांच्या दुकानाचा जो चौकशी अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना पाठविला आहे त्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना आवश्यक वाटल्यास ती जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच विनामूल्य पुरवावी. याकरिता जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाचा कालावधी निश्चित करुन देण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी या मुद्दयावरील माहितीकरिता आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरावे आणि तदनंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित मागणी केलेली माहिती ही खाजगी व्यक्तीकडे असल्यामुळे आणि सदरचे स्वस्त धान्य दुकानदार हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) नुसार 'सार्वजनिक प्राधिकरणा' च्या व्याख्येत मोडत नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल.

दिनांक २३-०६-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी दृष्टोत्पत्तीस आलेल्या गोष्टी, प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत हे पाहता आयोगाचे दिनांक २३-०६-२०१० रोजीच्या सुनावणीतील निष्कर्ष कायम करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना विनामूल्य व मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रत्नाकर पंडितराव भवर, रा. जामठी खु. पो. भांडेगांव, तालुका जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२८

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश साहेबराव लांडगे,<br>पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : उप विभागीय अधिकारी (महसूल), अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : प्रतिनिधी- श्री. बी. एन. वांजरखेड-कर, अव्वल कारकून- उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : श्री. मारोती विठ्ठल साळवे | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शीघ्र टपालाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. मौजे फुले पिपळगांव गट नं. २० गट नं. २६० येथील संचिका क्रमांक 79/ जमाबंदी/(2)CR-42 तहसिल कार्यालय माजलगाव दि. 31/3/1992 अन्वये गायरान जमीन वाटप झालेल्या श्री मारोती विठ्ठाल साळवे यांची ताबा पावतीची झेरॉक्स प्रत छांयाकित करुन घ्यावे.

२. गट नं. 20 व 260 मधील श्री मारोती विठ्ठाल साळवे यास जमीन दिलेल्या जमीनीची चर्तु:सिमा दर्शवणारी प्रत छांयाकित करुन घ्यावी. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीने सदरचा अर्ज उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांच्याकडे केला होता. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी तहसील कार्यालय, माजलगाव यांच्याशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तहसीलदार, माजलगाव यांना अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत देऊन अपिलार्थीस नियमानुसार माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने तहसीलदार, माजलगाव यांना दिनांक २२-०१-००९ रोजी अर्ज करुन परत त्यांना आवश्यक असलेली माहिती मागितली. तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही पत्रव्यवहार न केला गेल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या नस्तीचा त्यांनी शोध घेतला असता त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना आढळून आली नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांनी तहसीलदार, माजलगाव यांना दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अग्रेषित केला होता. तथापि तहसीलदार, माजलगाव यांनी यासंदर्भात कोणती कार्यवाही केली याची त्यांना कल्पना नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील अपिलार्थीने संदर्भित

केलेल्या नस्तीचा क्रमांक आधारभूत मानून अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप पाहता आता तहसीलदार, माजलगांव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी माजलगाव तहसील कार्यालयातर्फे दिनांक ३१-०३-१९९२ च्या ज्या आदेशान्वये गायरान जमिनीचे वाटप झाले आहे तो आदेश आधारभूत मानून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा शोध या प्रकरणाशी संबंधित इतर नस्त्यांमध्ये घेऊन अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात तहसीलदार, माजलगाव यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाची आणि यानंतर अपिलार्थीने तहसीलदार, माजलगाव यांना पाठविलेल्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राची तहसीलदार, माजलगाव यांनी कोणतीही दखल घेतली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी आदेशित करुनही अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील माहितीसंदर्भात काहीही कळविले नाही. अशा प्रकारे तहसीलदार, माजलगाव यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास आणि त्यांच्या विनंती अर्जास आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न करुन त्यांच्या आदेशाची अवहेलना केली आहे व अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवले आहे. अशा प्रकारे तहसीलदार, माजलगाव यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (महसूल) यांना या प्रकणाशी संबंधित तहसीलदार, माजलगाव, जिल्हा बीड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी नवीन कोणतीही बाब आयोगासमोर आली नाही त्यामुळे मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष लक्षात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, माजलगाव, जिल्हा बीड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ तहसीलदार, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२९

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र शिवराम जावळे,<br>मिलिंदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | त्रयस्थ पक्ष : श्री. ब्रम्हप्रकाश | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, संबंधित माहिती अधिका-याने माहिती अधिकार कायद्याचा भंग केला असल्याने कायद्याच्या तरतुदीनुसार त्यांना शिक्षा देण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. ब्रम्हप्रकाश, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी हे रुजू झाल्यापासून रोजगार हमी योजनेअंर्तगत किती कामे करण्यात आली त्या सर्व कामांचा मजूर उपस्थिती अहवाल व कामावरील हजेरीपत्रकांच्या छायांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत

विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २३-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी माहिती अधिका-याशी संपर्क साधल्याबाबत एखाद्या सबळ पुराव्याची आयोगाने अपिलार्थीकडे मागणी केली असता, अपिलार्थी-कडे अशा प्रकारचा पुरावा उपलब्ध असल्याचे आयोगास आढळून आले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मजुराच्या हजेरीपटाच्या छायांकीत प्रतीसाठी त्यांना येणा-या खर्चाचे अनुदान त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना हा खर्च करता येणे शक्य नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांनी व्यक्तिशः घेऊन जाण्याबाबत अपिलार्थीस दिनांक १०-०६-२०१० रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. परंतु त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतः हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. एवढे असले तरी अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी

यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर नवीन कोणतीही बाब आली नसल्याने मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष विचारात घेऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र शिवराम जावळे, मिलिंदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३१

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अन्ना संपतराव बनकर,<br>मु. सुलीभंजन, पोस्ट तालुका खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सह आयुक्त, जात पडताळणी समिती कार्यालय,<br>औरंगाबाद | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>सह आयुक्त, जात पडताळणी समिती कार्यालय,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |

त्रयस्थ पक्ष : श्री. अस्लम हुसेन खाँ मन्सुरी : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०८-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. अस्लम हुसेन खाँ मन्सुरी, पंचायत समिती सदस्य, खुलताबाद यांच्या जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राबाबत एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाने त्यांच्या जात प्रमाणपत्रा-बरोबर जोडलेला प्रवेश निर्गम उतारा व इतर पुराव्याच्या छायांकित प्रती, जात प्रमाणपत्र वैधता करण्यासाठी जोडलेल्या पुराव्याच्या छायांकित प्रती, सक्षम अधिकाऱ्याने या प्रकरणी तयार केलेली टिपणी व दुर्गम चौकशी केली असल्यास त्याच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समोवश होता. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, याचा कोणताही खुलासा त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८-०६-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत, सदरचे प्रमाणपत्र कोणत्या कार्यालयातून व केव्हा पाठविण्यात आले, त्यांची जात इत्यादी तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले व सदरचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त

न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २४-०६-२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक आहे. त्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या संबंधित त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यास हरकत नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत कोणताही इतर संदर्भ दिलेला नाही, जो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी अर्ज करताना पुरविणे भाग होता. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०८-२००९ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये देखील अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या जात प्रमाणपत्राचा तपशील, उदाहरणार्थ जात प्रमाणपत्र कोणत्या कार्यालयाने व कधी निर्गमित केले, त्रयस्थ पक्षाची जात हा भाग जन अपिलीय अधिकाऱ्याने निर्णय दिल्यानंतर माहिती अधिकाऱ्यास सादर केला आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कामकाजाचे सर्वसाधारण स्वरुप लक्षात घेता, त्यांच्या कार्यालयाकडे जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी दररोज असंख्य प्रकरणे सादर होत असतात. त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांना ज्या त्रयस्थ पक्षाच्या विषयी माहितीची आवश्यकता आहे त्या त्रयस्थ पक्षाचा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये दिलेला तपशील जन माहिती अधिकारी यांना सादर करणे गरजेचे आहे. या तपशीलाअभावी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज हा मोघम स्वरुपाचा असल्यामुळे आणि अशी माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

उपलब्ध कागदपत्रांच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २८-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अन्ना संपतराव बनकर, मु. सुलीभंजन, पोस्ट तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त, जात पडताळणी समिती कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, जात पडताळणी समिती कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३२

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे, प्लॉट नं. पी/४/४/६, विठ्ठलनगर, रामनगर, एन-२, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>सिडको, नविन औरंगाबाद | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रशासक, सिडको, नविन औरंगाबाद | | : | उपस्थित<br>(तत्कालीन) |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | जनसंपर्क अधिकारी, सिडको, औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मार्च, २००६ ते मार्च, २००९ या कालावधीतील, त्यांच्या कार्यालयाने केलेल्या खरेदीच्या आणि स्थापत्य कामाविषयी काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करताना सादर केला नव्हता. तरीही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहण्याचे सूचित केले व तदनंतर दि. ०६.०७.२००९ रोजी अपिलार्थीस ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०८.२००९ रोजी

निर्णय देऊन अपिलार्थी सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होत्या.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असूनही व त्यांनी अपिलार्थीस त्यांचे दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र सादर करण्याचे सूचित करुनही अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात आहे, तरीही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली जवळजवळ सर्व मुद्यांवरील माहिती तयार केली असून ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ मधील त्यांच्या कार्यालयातील अभियंता व कर्मचाऱ्यांना दिलेल्या अगाऊ रकमेचा तपशीलवार हिशोब, ही माहिती प्रचंड प्रमाणात असल्यामुळे, या माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ मधील जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या साहित्याची खरेदी केली जाते, त्या साहित्याची नावे व त्या साहित्याच्या पुरवठाधारकाचे नाव, त्यांना किती रकमेची खरेदी एकाच वेळी करता येते, ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्रत्येक वर्षी करण्यात आलेल्या स्थापत्य कामांची यादी, काम करणाऱ्या संस्थेची व एजन्सीची नावे आणि कामांची अंदाजपत्रकीय रक्कम ही माहिती वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास दाखविली असता, या माहितीमध्ये- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित संपूर्ण माहिती आणि मुद्दा क्र. ६ मधील तपशीलवार हिशोबाच्या छायाप्रती,ही माहिती वगळता उर्वरित मुद्यांच्या माहितीचा समावेश असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ व साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, केवळ या मुद्यावरील माहितीकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून या कागदपत्रांची त्यांनी

पाहणी स्वतः उपस्थित राहून करावी व उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात आले होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. दिनांक २४-०६-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या गोष्टी, प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कबूल केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य, टपालाव्दारे पुरवावी व मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ शी संबंधित माहितीचे अभिलेखे विनामूल्य तपासणीसाठी याच कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्यावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी व मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ शी संबंधित माहितीचे अभिलेखे विनामूल्य तपासणीसाठी याच कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्यावेत.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे, प्लॉट नं. पी/४/४/६, विठ्ठलनगर, रामनगर, एन-२, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३३

सुनावणी दिनांक २८-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र हौसराव देशमुख,<br>रा. कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई,<br>जिल्हा बीड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील घरपट्टी, नळपट्टी,जमीन अतिक्रमण करवसूलीशीसंबंधित दि. ०१.०४.२००५ ते नोव्हेंबर, २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे व शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगर परिषद हद्दीमधील मालमत्ता धारक, नळकनेक्शनधारक,अतिक्रमण भागातील ज्यांच्याकडून भुईभाडे वसूल केले जाते यांची यादी वॉर्डनिहाय नाव व पत्त्यासह, एकूण संख्या, वसूली कर्मचारी यांनी केलेल्या विभागवार व प्रभागवार मालमत्ताधारक,नळकनेक्शनधारक व अतिक्रमण धारकांची वॉर्डविभागणीनुसार संख्या, नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे संख्येसह नाव व पदनामासह माहिती व प्रभाग व विभागानुसार कर्मचारी मालमत्ताधारक नळकनेक्शनवर अतिक्रमित प्रत्येकी विभागणी यादीसह माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने दि. २०.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २८-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २७.०६.२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, विशेषतः जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०.०६.२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर करुन त्यांना केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे वारंवार मागत असतात. संबंधित अपिलार्थी हे नगर परिषद, गेवराई येथे पाणीपुरवठा विभागात, विभाग प्रमुख असताना त्यांनी अक्षम्य हलगर्जीपणा केला असल्यामुळे त्यांना दि. १२.०१.२००९ रोजी निलंबित केले होते. तदनंतर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे १५ ते २० अर्ज केले आहेत. विचाराधीन अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणास्तव केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०६.२००९ रोजी टपालाद्वारे माहिती पुरविल्याचा सबळ पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या पुराव्याचे अथवा त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित माहितीवर त्यांनी आजतागायत कोणतेही भाष्य केलेले नाही. हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन ज्या कारणास्तव अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे, ते कारणच मूळात निकाली निघत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

दिनांक २४-०६-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या गोष्टी, प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

दिनांक २७-०६-२००९ रोजी माहिती पुरविली आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २८-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, रा. कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७६

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळगीर गंगागीर गिरी,<br>मु. सावरगाव, पो. उंबरखेड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अधिकारी,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | | : |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रात निवड केलेल्या काही लाभार्थ्यांना सहा गुण असताना, लाभार्थ्यांची निवड करताना का डावलण्यात आले, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या संदर्भात माहिती दिली. तथापि माहिती दिली नाही या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) अन्वये विहित केलेल्या मुदतीत कोणतेही आदेश पारित न केल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०१-२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरविली असून, सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगद्वारे पाठविली आहे. या माहिती बरोबरच शासनाच्या या विषयासंदर्भातील आदेशाच्या प्रतीही त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या असल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा म्हणून त्यांच्याकडील जावक रजिस्टरची मूळ प्रत आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीवरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या शंकेचे निरसन करणारी माहिती अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीस योग्य माहिती पुरविल्याच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांना अपेक्षित असलेली माहिती देखील, जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्रामध्ये आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अपिलार्थीचे

होते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाबरोबर सादर केलेले नाही व या संदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. अपिलार्थीस आता माहिती देय नसूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य तो खुलासा केला असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिल्याचे आयोगास अवगत केले. तसेच याबाबतचे पत्र देखील आयोगास सादर केले. तसेच नवीन कोणतीही माहिती आज रोजी सादर करण्यात आली नाही. मागील सुनावणीच्या वेळी उपस्थित झालेले मुद्दे व आयोगास प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २९-१०-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळगीर गंगागीर गिरी, मु. सावरगाव, पो. उंबरखेड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७७

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भारत आनंदा सावंत,<br>कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | अपिलार्थी : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),<br>जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>परभणी | | : |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | कार्यालयीन अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, परभणी | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही गोपनीय अहवालाची असून ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. तरी सुध्दा त्रयस्थ पक्षांची मान्यता घेऊन माहिती दिली आहे. सुरुवातीला १६ त्रयस्थ पक्षांची सहमती घेऊन माहिती दिली आहे व नंतर उर्वरित माहिती दिली आहे. आज रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिलेली आहे. आपल्या युक्तिवादात अपिलार्थीने हे बाब मान्य केली व त्यांचे याबाबत काहीही म्हणणे नाही असे सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( दी. बा. देशपांडे )** |
| **दिनांक २९-१०-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. भारत आनंदा सावंत, कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७८

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिलीप रामचंद्र माने,<br>द्वारा, दै. लोकप्रश्न, १६ जलतरणिका नेहरु रोड,<br>परभणी | : | अपिलार्थी : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी यांनी मे - २००८ मध्ये प्रसिध्द केलेल्या निविदा सुचना क्रमांक ४ मधील कामाच्या उघडण्यात आलेल्या निविदेसंदर्भात एकूण १३ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागितला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी माहिती अभिलख्यावर उपलब्ध आहे अशीच माहिती उपलब्ध करुन देणे अभिप्रेत असल्याचे नमूद करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या

निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधीक्षक अभियंत्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. सदरचा अपील अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी दिनांक ०२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांच्याकडे पाठविला. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाच्या निविदा उघडण्यासंदर्भात १० मुद्यांद्वारे जन माहिती अधिकाऱ्याचा खुलासा मागितला आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या दहाही मुद्यांचे स्वरुप हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारे आणि त्यांच्या निर्णयाबद्दलचे कारण विचारणारे अशा स्वरुपाचे असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची माहिती समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकाऱ्याने अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या एखाद्या कार्यालयीन निर्णयाबाबत त्यांच्याकडे खुलासा अथवा स्पष्टीकरण विचारणे व जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे खुलासे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नाहीत. त्यामुळे मूळात या प्रकरणी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ मधील, "कोणत्या नियमानुसार शुध्दीपत्र दिले" या भागावरील माहिती वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यांवर अपिलार्थीस माहिती देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील, "शुध्दीपत्र कोणत्या नियमात दिले" या भागाची माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

प्रसंगावशात, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या कामाच्या निविदा उघडण्यामध्ये संबंधित प्राधिकरणाकडून बरीच अनियमितता झाली असण्याची शंका अपिलार्थीस वाटत आहे. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या या शंकेचे निरसन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे आयोगास सांगितले.

दिनांक २९-०६-२०१० रोजी सुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे, प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, आयोगाने दिनांक २९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीत काढलेले निष्कर्ष व आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने केलेला युक्तिवाद या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीप रामचंद्र माने, द्वारा, दै. लोकप्रश्न, १६ जलतरणिका नेहरु रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७९
सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे,<br>मु. पो. फॉरेस्ट ऑफीस जवळ, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक<br>शाळा, पाळा, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने, जन अपिलीय अधिकाऱ्याने आदेशित करुनही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत संबंधितांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पाळा, तालुका मुखेड, जि. नांदेड यांच्याकडे, त्यांच्या केंद्राअंतर्गत आलेल्या अनुदानाचा खर्च केलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६ ते ३० जून २००७ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साध्या टपालाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८-०९-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यास सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९-०६-२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक २९-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली. आज रोजी पुन्हा कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर कोणती माहिती पुरविली याचा तपशील, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून परिपूर्ण माहिती मिळाली नाही म्हणजे अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या मुद्यावर माहिती देणे बाकी आहे याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी परिपूर्ण माहिती दिली नाही हा त्यांचा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या निर्णयावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीचा भंग केल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि कोणीही उपस्थित नसल्यामुळे याबाबत आयोगापुढे पुरेशी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पाळा, तालुका मुखेड, जि. नांदेड यांना समज द्यावी असे आयोगाचे निर्देश आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य नोंदणीकृत डाकेने पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, मु. पो. फॉरेस्ट ऑफीस जवळ, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पाळा, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८०

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

१ श्रीमती शेख तबस्सुमबी इस्माईल, : अपिलार्थी : अनुपस्थित
महेबूबबी मंजिल, रियाज कॉलनी, शाम नगर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी : अनुपस्थित
तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय,
प्रकाशनगर, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : अनुपस्थित
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
लातूर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती सय्यद रुक्साना दस्तगीर : अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी सन १९९८-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेतील अतिरिक्त शिक्षकांची यादी, शालेय पोषण आहार योजना सुरु झाल्यापासून २००८ पर्यंतची माहिती, सहशिक्षिका श्रीमती सय्यद रुक्साना दस्तगीर यांच्या प्रथम,द्वितीय व कायम वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती, त्या कोणता विषय शिकवतात, त्यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या टिपणीच्या छायाप्रती, संस्थेने या कालावधीमध्ये उचललेल्या वेतनेतर अनुदानाची रक्कम व त्याचा विनियोग कसा केला याची माहिती व सन २००२ पासून श्रीमती सय्यद रुक्साना दस्तगीर यांनी घेतलेल्या रजेच्या तपशीलाची साक्षांकित प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

१९.११.२००८ रोजी सुनावणी ठेवूनही कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

मागील रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी या श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब यांच्या द्वितीय पत्नी असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस यापूर्वीच वेळोवेळी पुरविली आहे. तथापि आता ही माहिती ते अपिलार्थीस परत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी या त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज पोस्टाने पाठविल्याचा दावा करतात, परंतु संबंधित पोस्टमनशी संगनमत करुन माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत व नंतर माहिती अधिकाऱ्यास माहिती अधिकाराखाली त्यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे करीत असतात. माहिती अधिकाऱ्यास केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने त्या अशाप्रकारे माहितीची मागणी करीत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेला युक्तिवाद आयोगास तपासता येणार नाही. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळया मुद्याद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता यामधील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही देय असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्ष, श्रीमती सय्यद रुक्साना दस्तगीर यांच्यासंदर्भातील त्यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती, त्यांच्या सन २००७-०८ या वर्षातील टाचणाच्या छायाप्रती आणि घेतलेल्या रजा, ही माहिती देखील सार्वजनिक असल्यामुळे ती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत असू नये. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "शालेय पोषण आहार योजना सुरु झाल्यापासून २००८ पर्यंतची माहिती," अशी माहिती मागविली आहे. ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची आणि मोघम अशी आहे. शालेय पोषण आहार योजनेची माहिती म्हणजे या योजनेतील नेमक्या कोणत्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, तो मुद्दा अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.०७.२००८

रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाशी संबंधित सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी स्वतः उपस्थित नाहीत, या कारणास्तव अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे टाळले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने स्वतः उपस्थित असणे त्यांना अनिवार्य नाही. मात्र त्यांचे म्हणणे अपिलार्थी त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नोंदवू शकतात, याची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन, इतःपर माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार आपला स्वयंस्पष्ट निर्णय पारित केला जाईल, याची दक्षता घ्यावी.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती शेख तबस्सुमबी इस्माईल, महेबूबबी मंजिल, रियाज कॉलनी, शाम नगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, प्रकाशनगर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१५

सुनावणी दिनांक  २९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रेनगुंटवार नरेश गणेशराव,<br>रा. पोलीस स्टेशनजवळ, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, सहयोग सेवाभावी संस्था, विष्णूपुरी, नांदेड | : प्रतिवादी : | प्रतिनिधी- श्री. हिवंत मनुरथ सखाराम- उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, श्रीनगर, नांदेड | : | प्रतिनिधी- जैन एस. एफ.- उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,सहयोग सेवाभावी संस्था, विष्णूपुरी,नांदेड यांच्याकडे, त्यांच्या संस्थेमधील अध्यापक विद्यालयाच्या संदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे सन २००५-०६ ते दिनांक ३१.०१.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जानुसार त्यांनी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,श्रीनगर,नांदेड यांच्याकडे दिनांक २१.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, श्रीनगर,नांदेड यांनी काय निर्णय दिला, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. परंतु तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक २९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्व जण गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर सांगितले की, अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरले नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जैन एस. एफ. यांनी आयोगास असे सांगितले की, सदर महाविद्यालयास कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. तसेच त्यांचे संचालनालय पुणे येथे कार्यरत असून त्यांचे कार्यालय हे शासकीय कार्यालय आहे. त्यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, सदरहू सेवाभावी संस्था ही विना अनुदानित संस्था आहे व त्यांना शासनातर्फे कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही, त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअंतर्गत या संस्थेचा सार्वजनिक प्राधिकरण म्हणून समावेश होत नाही.

अपिलार्थी आज रोजी व मागील सुनावणीस अनुपस्थित होते त्यामुळे त्यांची बाजू आयोगास कळू शकली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, अधीक्षक हे शासकीय कर्मचारी आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीवरुन असे दृष्टोत्पत्तीस येत आहे की, ही सेवाभावी संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) च्या व्याख्येत बसत नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. तथापि या प्रतिनिधीने असेही सांगितले की, या महाविद्यालयातील प्रवेश हे शासनामार्फत निश्चित होतात व ते २० टक्के जागा भरतात आणि फी स्ट्रक्चर हे शासनामार्फत निश्चित करण्यात येते. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देणे उचित होईल.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही सर्व माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत डाकेने पाठविणे उचित ठरेल या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना देय असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत

टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २९.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेनगुंटवार नरेश गणेशराव, रा. पोलीस स्टेशनजवळ, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सहयोग सेवाभावी संस्था, विष्णूपुरी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, श्रीनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१६

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,<br>सा. आत्ताच एक्सप्रेस, कार्यालय जे-१३, विजयश्री कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ.), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ.), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | : |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | विभागीय लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ.), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिनिधी- श्री. ए. आर. जाधव, वरिष्ठ लिपीक- उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, दगडी धरण उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दि.३१.०३.२००७ पासून ते २०.०८.२००९ पर्यंतच्या कालावधीमध्ये जेवढया निविदा प्रसिध्द केल्या त्या दैनिकांच्या छायाप्रती, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, विभागीय लेखापाल, तांत्रिक शाखा व भांडारपाल यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या नंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.०९.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

मागील सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि. २३.११.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा सबळ पुरावा म्हणून रजिस्टर्ड पोस्टाची पावती आयोगास सादर केली असून यावरुन अपिलार्थीस ही माहिती दि. २६.११.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी दि. २०.०८.२००९ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १९.०९.२००९ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे, सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ६५ दिवसांच्या विलंबाने पुरविली असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांना ही माहिती देण्यासाठी फारसे कष्ट घ्यावे लागणार होते किंवा त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती, अशातील कोणतीही बाब संभवत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'जन माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांनी अपिलार्थीस एकूण ६५ दिवसांच्या विलंबाने माहिती न पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे आणि अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी आता नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पुरविली असल्याने व प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही आक्षेप आयोगाकडे प्राप्त न झाल्याने अथवा या संदर्भात मौखिक युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले की, अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी हे बदलून गेलेले आहेत व नवीन जन माहिती अधिकारी आज रोजी सुनावणीसाठी आले नाहीत कारण कर्मचा-यांची वेतने चालू आहेत. सुनावणीमध्ये आयोगाने अपिलार्थीस माहिती वेळेत का दिली नाही याबाबत विचारणा केली असता जन माहिती अधिकारी हे लेखापाल असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

प्रकरणात दिनांक २९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे, प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, तसेच आयोगाने काढलेले निष्कर्ष आणि आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेल्या बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

सचिव (जलसंपदा), मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, सा. आत्ताच एक्सप्रेस, कार्यालय जे-१३, विजयश्री कॉलनी,

एन-५, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ.), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, दगडी धरण उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१७

सुनावणी दिनांक २९-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शेख सादेख वाहेद,<br>रा. .फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>परभणी | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>परभणी | | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : | कामेल उर्दू एज्युकेशन सोसायटी परभणी संचलित कामेल उर्दू शाळा | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, कामेल उर्दू शिक्षण संस्था संचलित, कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा वांगी रोड,युसूफ कॉलनी,परभणी ही शाळा अनुदानित झाल्यापासून ते दि. १५.०६.२००९ पर्यंतच्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने प्रत्येक मान्य शिक्षक/शिक्षिकांचे संस्थेने वैयक्तिक मान्यतेसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दाखल केलेल्या प्रत्येक शिक्षकाचे रुजू आदेश (Order of Appointment), शिक्षकांच्या रुजू आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिल्या गेलेल्या सर्व शिक्षकांच्या आदेशाच्या वैयक्तिक मान्यतेच्या वर्षनिहाय सत्यप्रती, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २९.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्याने कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २२.१२.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्या वेगळया अर्जाच्यासंदर्भात पुरविली गेली असल्यामुळे त्यांना या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जास प्रतिसाद देणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, कामेल उर्दू शिक्षण संस्था परभणी संचलित कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा, वांगी रोड,युसूफ कॉलनी,परभणी या शाळेसंदर्भात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक आहे. त्यामुळे या प्रकरणी जरी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली असली तरी तिचे सार्वजनिक स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय असू नये. कोणत्याही शाळेस शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर शाळेतील शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाला शिक्षणाधिकारी कार्यालयातून वैयक्तिक मान्यता दिली जाते. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस एकूण चार शिक्षकांच्या आणि एका शिक्षण सेवकाच्या पदास मान्यता दिल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देताना या मुद्यासंदर्भात त्यांनी फक्त एका शिक्षण सेवकाच्या नेमणूकीच्या आदेशाची प्रतच अपिलार्थीस दिली आहे. संबंधित शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती ही अपूर्ण असल्याचे आयोगास आढळून येत आहे. तसेच यावरुन दोन पर्याय असू शकतात. एक तर कामेल उर्दू शिक्षण संस्था परभणी संचलित कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा वांगी रोड,युसूफ कॉलनी,परभणी या संस्थेने चार शिक्षकांना मूळात नेमणूकांचे आदेश दिले नसावेत आणि नेमणूकीचे आदेश नसतानाही शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी संबंधित शिक्षकांच्या नेमणूकीस त्यांच्या स्तरावर अवैधरित्या मान्यता दिली आहे किंवा संबंधित शिक्षकांच्या संस्थेने सादर केलेल्या नेमणूक आदेशाच्या प्रती शिक्षाधिकारी (प्राथमिक),

जि.प.परभणी यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्या असाव्यात. माहिती अधिकाराखाली कोणतीही माहिती मागितल्यानंतर केवळ कार्यालयात ही माहिती उपलब्ध नाही असे कारण सांगून अर्जदारास माहिती न देण्याचे बऱ्याच सार्वजनिक प्राधिकरणाकडून हेतूपुरस्सर टाळल्याचे आयोगास बऱ्याच प्रकरणात आढळून आले आहे. विशेषतः शिक्षण संस्थांच्या संदर्भात व शाळेची माहिती देताना संबंधित मुख्याध्यापकापासून ते शिक्षणाधिकारी यांच्या स्तरापर्यंत सर्वजण त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध नसल्याचे कारण दर्शवून अर्जदारास माहिती न देण्याचे टाळत असल्याच्या अनेक घटनांची नोंद आयोगाने घेतली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस उर्वरित चार शिक्षकांच्या नेमणुकीच्या आदेशाच्या प्रती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी संस्थेच्या ज्या चार शिक्षकांच्या नेमणूकीस त्यांच्याकडील दि. २५.०३.२००४ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली आहे त्या शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात. जर शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयात आढळून आल्या नाहीत, तर सदर विषयाशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यांवर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी आणि त्यांनी संस्थेच्या संबंधित शिक्षकांच्या नेमणूक आदेशाच्या प्रमाणित प्रती त्यांच्याकडे उपलब्ध होईपर्यंत, या संस्थेस त्यांनी कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान वितरीत करु नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सुसंगत असल्याने त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत दि. १४.०७.२००९ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे अनिवार्य होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीस ही माहिती दि. १४.०७.२००९ नंतर दि. २२.१२.२००९ रोजी म्हणजेच, अंदाजे पाच महिन्याच्या विलंबाने प्राप्त झाली आहे व प्राप्त झालेली माहिती देखील वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे अपूर्ण आहे. अशाप्रकारे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन स्वतःला अधिनियमातील २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगाने त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी देऊनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर कोणतेही समर्थन करता आले नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीचा भंग केल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी, श्री. आर.एम.इघारे यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी असे आयोगाने दिनांक २९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी निष्कर्ष काढला आहे. ही शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी श्री. इघारे यांनी करणे आवश्यक आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांनी या प्रकरणी संस्थेच्या ज्या चार शिक्षकांच्या नेमणूकीस त्यांच्याकडील दि. २५-०३-२००४ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली आहे. त्या शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केला आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी श्री. आर. एम. इघारे यांनी या प्रकरणी त्यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख सादेख वाहेद, रा. .फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर. एम. इघारे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१८

निर्णय दिनांक: २९.१०.२०१०

१ श्री. जीवन रामराव उबाळे, : अपिलार्थी
संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. च्या मागे,
नगर रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १,
बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपेक्षित स्वरुपात दिलेली नाही, अपूर्ण आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक केलेल्या कसूरीबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित १९८८ ते दिनांक ०३.०३.२००९ या कालावधीतील काही माहिती एकूण १४ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.०४.२००९ रोजी शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१.०३.२००९ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या माहितीवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस दिनांक ३१.०३.२००९ व दिनांक १५.०७.२००९ रोजी आवश्यक ती माहिती दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०६.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला कथित निर्णय आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर जन माहिती अधिकारी केलेल्या युक्तिवादावरुन व  आयोगास उपलब्ध करुन देण्यात कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मधील भाडेकरुंना काढण्यासाठी कायदेशीर प्रक्रियांचा अवलंब करण्यात आला होता काय ?  या भागावरील आणि मुद्दा क्रमांक ९, १०, ११ व १३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही.  कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे आयोगास आढळून येत आहे.  अशा प्रकारे ही माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.  उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.  अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित माहितीपैकी काही भाग राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी संबंधित आहे.  अपिलार्थीने या प्रकरणी राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे.  त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मध्ये विहित केलेल्या मुदतीत हस्तांतरीत केला नसल्यामुळे आता त्यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती मुद्देनिहाय पुरवावी लागेल.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विस्कळीत स्वरुपात माहिती दिलेली आहे व बऱ्याच मुद्यावर ही माहिती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी अशा सूचना दिल्या आहेत.  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारच्या सूचना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत नाही.  या अधिनियमाचा मूळ उद्देश अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त होणे असा आहे.  परंतु या प्रकरणी हा उद्देश सफल झाल्याचे आयोगास आढळून येत नाही.  सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत

आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये वर स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत मुद्येसूद व विनामूल्य पुरवावी. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस अपूर्ण व विस्कळीत स्वरुपात माहिती पुरविली गेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २० इतके त्यांना परत करावे.

दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जातील वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत मुद्देसूद व विनामूल्य पुरवावी. तसेच याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २० इतके त्यांना परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : . .२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. जीवन रामराव उबाळे, संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. च्या मागे, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१९
निर्णय दिनांक २९.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनिष प्रेमचंद बोथरा,<br>३५, संत एकनाथ सोसायटी, आकाशवाणीसमोर,<br>जालना रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)<br>विभाग, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी अपूर्ण माहिती दिली आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, लाडगांव रोड ते नांदुरढोक शिवगाढे वस्ती रस्ता कि. मी. ०/०० ते /०० या रस्त्याच्या कामाची निविदा व सर्व कागदपत्रांची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६६ इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक २७.०७.२००९ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला असल्याने अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३.०८.२००९ रोजी त्यांच्याकडील माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०९.२००९ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १२.१०.२००९ रोजी पारीत केले. या अपील निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे या प्रकरणाशी संबधित प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलीय अधिकाऱ्याने सुनावणी घेतली नाही असे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आणि अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसांच्या आत त्यांना आवश्यक असलेली, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली निविदा संचिका तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी आणि यानंतर

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यापूर्वी पुरविली नसेल तर त्यांनी या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस या कालावधीमध्ये विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात. त्यानुसार आज सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.०७.२०१० रोजी दिलेली आहे व अपिलार्थीने याबाबत दिलेली पोचपावती आयोगासमोर सादर करण्यात आली. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर केलेला नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बां.देशपांडे ),**
**दिनांक . .२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. मनिष प्रेमचंद बोथरा, ३५, संत एकनाथ सोसायटी, आकाशवाणीसमोर, जालना रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२०

निर्णय दिनांक २९.१०.२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती देवूबाई भ्र. गंगाधर मोकळे,<br>रा. किवळा, तालुका लोहा,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत,<br>तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यानी विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती न देता ३० दिवसांनी प्रथम अपील केल्यानंतर व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर तहसील कार्यालयाने त्यांना, त्यांच्या मूळ अर्जातील माहिती एकूण दोन प्रती पाठविण्यात येत आहेत अशा अर्थाचे पत्र पाठवून प्रत्यक्षात त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झालेली

नाही. या कालावधीमध्ये अपिलार्थीने यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तोंडी विनंत्या करुन काहीही उपयोग न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे डिग्रस (खु.), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली येथील गट क्रमांक २९ मधील देवूबाई गंगाधर मोकळे यांच्या मालकीच्या फेरफार क्रमांक १ प्रमाणे चार आणे हिश्श्याचे विवरणपत्र, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वकिलाने अपिलार्थीच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती अपेक्षित असल्याचे

आयोगास स्पष्ट केले व जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थी यांना ७/१२ चा उतारा व फेरफार क्रमांक १ ची प्रत आतापर्यंत एकूण दोन वेळा विनामूल्य, दिनांक १०.१०.२००८ व दिनांक ०४.१२.२००८ रोजी अशी दोनदा माहिती दिली आहे. मूळात अपिलार्थीच्या वाटणीस आलेल्या अपिलार्थीच्या ज्या फेरच्या आधारे जमीन प्राप्त झाली त्या फेरमध्ये चुकीची नोंद झाली असल्यामुळे अपिलार्थीने यासंबंधी उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्याकडे प्रथम अपील करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तसे न करता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मौजे डिग्रस (खु.), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली येथील गट क्रमांक २९ येथील त्यांची चार आणे हिश्श्याची जमीन निश्चित कोणती याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे या गटाचा ७/१२ चा उतारा आणि या सर्वे नंबरमध्ये घेतलेल्या फेरची नोंद इतकीच माहिती उपलब्ध आहे. या नोंदीमध्ये जर सर्व संबंधितांना वाटप झालेल्या जमिनीची मोजणी केली तर ती २० आणे इतकी होत आहे. यांचा अर्थ अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेला फेरफार क्रमांक १ मधील नोंद चुकीच्या पध्दतीने घेतली गेली आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम २४७ प्रमाणे उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्याकडे प्रथम अपील करणे गरजेचे होते. तथापि अपिलार्थीने सदरचे अपील अपिलीय अधिकारी महसूल प्राधिकरणाकडे केलेले नाही. अपिलार्थीस जर त्यांच्या जमिनीची निश्चित माहिती हवी असेल तर त्यांनी प्रथमतः फेर क्रमांक १ मध्ये दुरुस्ती करुन घेऊन नंतर त्यांच्या मालकीच्या जमिनीची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून मोजणी करुन घेऊन तदनंतर आपापसात त्यांचे हिस्से ठरवून त्याप्रमाणे सुधारीत फेर तहसीलदार, वसमत यांच्याकडे सादर करुन त्याची नोंद त्यांच्या मालकीच्या जमिनीच्या कागदपत्रामध्ये करुन घेणे इष्ट राहील. अपिलार्थीचे या प्रकरणी माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती मूळात अस्तित्वातच नसल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणार नाही म्हणून अपिलार्थीचा प्रश्नावर योग्य ते मार्गदर्शन तहसीलदार, वसमत यांनी हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत एका पत्राद्वारे विनामूल्य करावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीमध्ये आयोगासमोर अशी वस्तुस्थिती समोर आली आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे. तथापि प्राप्त माहिती चुकीची आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी प्राप्त माहितीसंदर्भात त्यांचे जर काही आक्षेप असतील तर त्यांनी त्यासंदर्भात सक्षम प्राधिकरणाकरणे स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करावा.

तथापि अपिलार्थीस ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येत असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांची यासंदर्भात कारवाई करणे जरुरी दिसत आहे. सबब जिल्हाधिकारी,हिंगोली यांना यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी,हिंगोली यांना यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक . .२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्रीमती देवूबाई भ्र. गंगाधर मोकळे, रा. किवळा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१७

निर्णय दिनांक २९.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अविनाश बालराज नगरे,<br>रा. रंगारगल्ली, काद्राबाद,<br>जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व सदरचे अपील त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्याबद्दल केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत रो. ह. यो. अंतर्गत केलेल्या कामांची यादी, कामावरील अकुशल बाबीवर झालेला कामनिहाय खर्च आणि कामाची पाहणी केलेल्या शाखा अभियंत्याचे नांव, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी त्यांना कोणत्या माध्यमाव्दारे माहिती अपेक्षित आहे त्याचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे दिनांक १६.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक २९.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी दिनांक १५.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दोन वर्षानंतरही जन माहिती अधिकारी यांच्या-

कडून प्राप्त झाली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावावी आणि त्यांनी मूळअर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

मागील सुनावणीच्या वेळी व आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६.०६.२०१० रोजी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती टपालाद्वारे विनामूल्य पुरविली आहे. या त्यांच्या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याची अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगची पावती आयोगास दाखविली. तसेच अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. ब्रम्हप्रकाश नावाचे उप अभियंता जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते आणि आता ते उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, हिंगोली या पदावर कार्यरत आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीच्या म्हणण्यात तथ्य असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने दिनांक १५.०५.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी करुनही त्यांना आयोगाकडील अपिलाच्या सुनावणीपर्यंत देखील जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही ही खरोखरच दुर्दैवाची बाब आहे. आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६.०६.२०१० रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेल्या कथित माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे व ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगच्या माध्यमाद्वारे पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला असल्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी लावलेला विलंब दुर्लक्षित करुन चालण्यासारखा नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व

व्याप्ती इतकी मर्यादित आहे की ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे कोणतीही अडचण असणे संभवत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. ब्रम्हप्रकाश हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकाऱ्याने आदेशित करुनही विहित मुदतीत माहिती न पुरवून स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उप अभियंता श्री. ब्रम्हप्रकाश (सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, हिंगोली या पदावर कार्यरत) यांना अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या मुदतीत त्यांचा कोणताही खुलासा आयोगा-कडे प्राप्त न झाल्यास, हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उप अभियंता श्री. ब्रम्हप्रकाश (सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, हिंगोली या पदावर कार्यरत) यांना एकूण रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( दी.बा.देशपांडे ),**
**दिनांक . .२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश बालराज नगरे, रा. रंगारगल्ली, काद्राबाद, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. ब्रम्हप्रकाश, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना (सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, हिंगोली) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५४

निर्णय दिनांक २९.१०.२०१०

१ श्री. एकनाथ वामन गायकवाड, : अपिलार्थी
द्वारा - मधुकर गोविंद चाबुकस्वार, ग्रामसेवक, निवृत्त
तहसीलदार, श्री. चव्हाण यांचे घर, प्लॉट क्र. ६१, वसंतनगर,
जवाहर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग
क्र. ५, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी १, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र. ५, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अभियंता, दगडी धरण, उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. एम. तिवारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०५.२००९ रोजी पुरविलेली माहिती ही चुकीची, अर्धवट व प्रमाणीत न केलेल्या स्वरुपात पुरविण्यात आली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ या मुद्यांवर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीवर वेगवेगळा आक्षेप नोंदविला आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना अपिलार्थीस परिपूर्ण माहिती देण्याचे आदेश द्यावे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २७ दिवस उशिरा व चुकीची माहिती पुरविल्याने त्यांनी अपिलार्थीस अचूक माहिती अर्जदारास पुरविणपर्यंत रु. २५० प्रतिदिनी या प्रमाणे एकूण २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कॉलनीतून बदलून गेलेले आणि कॉलनीमध्ये अनधिकृतरित्या घुसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आणि त्रयस्थ पक्ष श्री. डी. एम. तिवारी, शाखा अभियंता यांच्या संदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१.०१.२००१ पासून जे कर्मचारी कॉलनीतून बदलून गेले ते बदलून गेल्याची तारीख कॉर्टर सोडल्याची तारीख त्यांनी ज्या रेटने घरभाडे भरले तो रेट, दिनांक ०१.०१.२००१ पासून किती कर्मचारी विनापरवानगी निवासस्थानात घुसले त्यांची नावे आणि त्यांच्याकडून ज्या दराने भाडे वसून केले तो दर, दिनांक ०१.०१.२००१ पासून जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना निवासस्थानाच्या भाड्याच्या थकबाकीच्या सादर केलेल्या याद्याच्या प्रती, त्रयस्थ पक्ष श्री. डी. एम. तिवारी डीव्हीजन क्रमांक ५ मध्ये केव्हापासून कामाला आले आणि त्यांची रुजू होण्याची तारीख - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२.०५.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात सुनावणीच्या दिवशीच म्हणजे दिनांक २८.०५.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविलेली आहे. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला होता की, त्यांच्याकडून कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) यांनी भाडे वसूली चालू केली आहे. ती भाडे वसूली काय दराने करण्यात आली आहे याची माहिती त्यांना देऊन व तसेच त्यांना भाडे वसूली करिता लावण्यात आलेला दर आणि इतर कर्मचाऱ्यांना भाडे वसूली करिता लावण्यात आलेला दर याची माहिती त्यांना हवी होती. या माहितीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये समावेश नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होताकी, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २८.०५.२००९ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना भ्रमणध्वणीद्वारे दिनांक ०५.०५.२००९ रोजी कळविले होते. त्यांनी

आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५७/- इतके भरण्यासाठी पत्र लिहिले, सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने पैसे भरल्यानंतर माहिती घेऊन जाण्यात येईल असा अभिप्राय त्यांच्या दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या पत्रावर दिला आहे. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

मागील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यावरील माहिती त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०१.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्टपणे व व्यवस्थित मांडला नव्हता. तथापि त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर आक्षेप, त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केला आहे. त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना देण्यात आलेल्या मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहितीमध्ये कॉलनीतून बदलून गेलेल्या कर्मचाऱ्यांची बदलीची तारीख त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. तसेच मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात परवानगी न घेता निवासस्थान ताब्यात घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याकडून प्रत्यक्षात कोणत्या दराने भाडे वसूल केले याचा त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये समावेश नाही. तसेच मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये २००३ ते २००६ या कालावधीतील याद्याचा समावेश नाही आणि मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांना पुरविण्यात आलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सांक्षांकित केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८.०५.२००९ रोजी पुरविलेल्या माहितीवरुन आयोगास असे आढळून आहे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील कर्मचाऱ्यांच्याकडून काय दराने भाडे वसूल केले तो दर कळविलेला नाही. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये २००४ मधील दोन व्यक्तींची माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. २००५ व ०६ मध्ये अनधिकृतरित्या सरकारी निवासस्थानात कोणीही घुसले नव्हते असे

आयोगास अवगत केले. त्यामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती दिली असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने, त्यांना पुरविण्यात आलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सत्यपीत व साक्षांकित करुन दिली नाही अशी माहिती त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केली. या संदर्भात मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती सांक्षांकित स्वरुपात मागितल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता साक्षांकित स्वरुपात उपलब्ध होणार नाही. अशाप्रकारे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती मधील कर्मचाऱ्यांच्या बदलीची तारीख आणि अनधिकृतरित्या सरकारी निवासस्थान ताब्यात घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्याकडून त्यांनी काय दराने वसूली केली या मुद्यावरील माहिती देणे भाग असल्याचे सिध्द होत आहे. ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थी यांनी आयोगाकडील द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना २७ दिवस उशिरा व चुकीची माहिती पुरविल्याने त्यांच्यावर प्रतिदीनी रु. २५०/- या प्रमाणे एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती लावण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे. या संदर्भात

असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक ०१.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "प्रत्यक्षात" म्हणजे "व्यक्तिशः" माहिती अपेक्षिली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी दिनांक ०७.०५.२००९ रोजी प्रथमतः संपर्क साधल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु यापूर्वीच दिनांक ०५.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस भ्रमणध्वनीद्वारे त्यांच्या माहितीचे शुल्क कळविले होते व नंतर दिनांक ११.०५.२००९ रोजी अपिलार्थीस लेखी पत्राद्वारे या शुल्काची कल्पना दिली. सदर पत्र प्राप्त झाल्यावर अपिलार्थीने शुल्क भरुन नंतर माहिती घेण्यात येईल असा अभिप्राय देऊनही त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही भरले नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०५.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्हेतूने टाळले असल्याचे आयोगास कोठेही निःसंशयपणे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर २५,०००/- रु, इतक्या रकमेची शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना वरील परिच्छेदात नमूद केलेले आदेश देण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीने माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन केले व अपिलार्थी व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न झाल्यामुळे त्यांना माहिती दिली गेली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादन केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित

माहिती मधील कर्मचाऱ्यांच्या बदलीची तारीख आणि अनधिकृतरित्या सरकारी निवासस्थान ताब्यात घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्याकडून त्यांनी काय दराने वसूली केली या मुद्यावरील माहिती हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती मधील कर्मचाऱ्यांच्या बदलीची तारीख आणि अनधिकृतरित्या सरकारी निवासस्थान ताब्यात घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्याकडून त्यांनी काय दराने वसूली केली या मुद्यावरील माहिती हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक . .२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. एकनाथ वामन गायकवाड, द्वारा - मधुकर गोविंद चाबुकस्वार, ग्रामसेवक, निवृत्त तहसीलदार, श्री. चव्हाण यांचे घर, प्लॉट क्र. ६१, वसंतनगर, जवाहर कॉलनी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी १, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र. ५, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, दगडी धरण, उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५५

निर्णय दिनांक २९.१०.२०१०

१ श्री. भारत मारुती सोनवणे, : अपिलार्थी

रा. चुन्नमाँ चौक, मेन रोड माजलगाव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,

माजलगाव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जि. बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मनूर, ता. माजलगाव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गामपंचायत मनूर येथील जुने घर क्रमांक ३११ चे मालमत्ता रजिस्टरमधील सन २००८ ते ०९ या कलावधीतील प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माजलगाव यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.०४.२००९ रोजी निर्णय देऊन घर क्रमांक ३११ वर अपिलार्थीने नाव नसल्या कारणाने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात येत आहे.सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे व अपिलार्थीस ती मिळाली असल्याचे प्रतिपादन केले.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक . .२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. भारत मारुती सोनवणे, रा. चुन्नमाँ चौक, मेन रोड माजलगाव, जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मनूर, ता. माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५६

सुनावणी दिनांक २९.१०.२०१०

१ श्री. खोले प्रभाकर केशवराव, : अपिलार्थी :उपस्थित
रा. झेंडा चौक, मु. पो. ता. माजलगाव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :अनुपस्थित
कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | मोहिम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड | :अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कृषि विकास अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अनावश्यक व असमाधानकारक माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या दिनांक १५.०९.२००८ व २०.१०.२००८ रोजी सेवेत बहाल करण्याबाबत दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी विविध पुराव्यासह केलेली कार्यवाही व त्यांना निलंबीत करण्यापूर्वी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०६.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस, ७ दिवसाच्या आत त्यांच्या अर्जानुसार सादर करण्यात आलेल्या टिपणीच्या आणि त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या प्रती, देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक १६.०६.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्याशी संबंधित, अपहार प्रकरणातील संचिकेतील टिपणी क्रमांक ५८ ते ६२ च्या पानाच्या झेरॉक्स प्रती पुरविल्या. परंतु ही माहिती असमाधानकारक आणि अनावश्यक असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना या संदर्भात कोणताही युक्तिवाद करता आला नाही. आयोगासमोर हजर राहताना त्यांना ज्या प्रकरणाच्या संदर्भात आयोगासमोर उपस्थित राहावयाचे आहे त्या प्रकरणाची त्यांना कोणतीही माहिती नसल्याने व ते याबाबतीत पूर्णतः अनभिज्ञ असल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या संचिकेतील ५८ ते ६२ क्रमांकाच्या पानाच्या झेरॉक्स प्रती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. या पेक्षा जास्त माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना नाही असे आयोगास सुनावणीच्या वेळी आढळून आले आहे.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. त्यातील पहिल्या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या दिनांक १५.०९.२००८ व २०.१०.२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अशी माहिती मागितली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या कोणत्याही अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही म्हणजे अर्जदाराचा संदर्भीत अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ते अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या दिनांकापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि या संदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्याच्या टिपणीच्या प्रती ही होय. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १८.०४.२००९ रोजी यासंदर्भात संक्षीप्त स्वरुपात माहिती दिल्याचे आढळून येत आहे. तथापि त्यांच्या दिनांक १६.०६.२००९ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी या संदर्भात अपिलार्थीस दिनांक १६.०६.२००९ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध टिपणीच्या प्रती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या मुद्यावर आता जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट

करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५.०९.२००८ व २०.१०.२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक १८.०३.२००९ पर्यंत विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती म्हणून, विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना सेवेतून निलंबीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अशी माहिती मागितली होती. ही प्रत अपिलार्थीस दिनांक २४.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकाराअंतर्गत पुरविल्याचे अपिलार्थीस दिनांक १८.०४.२००९ रोजी कळविले आहे. अपिलार्थीस त्यांना निलंबीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस खरोखरीच प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती परत एकदा विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी शिस्तभंगाची कारवाई करण्याची धमकी देऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कायद्याचा वापर करु नये असे त्यांना सूचित केले. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदार हा जरी सार्वजनिक प्राधिकरणाचा सेवक असला तरीही एक भारतीय नागरिक या नात्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याचा पूर्ण हक्क आहे, याची नोंद जन माहिती व अपिलीय अधिकाऱ्याने घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व तसेच त्यांना इतपत त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना माहिती अधिकारावर वापर न करण्याबाबत व केल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा वापर न करण्याची धमकी इत:पर देऊ नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिली आहे. तसेच अपिलार्थी यांनी सादर केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीवरुन

त्यांना माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करण्याबाबत परावृत्त करण्याचा प्रयत्न झालेला असल्याचे स्पष्ट होत आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे, असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली (पत्र व्यवहाराच्या प्रती) व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २९.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. खोले प्रभाकर केशवराव, रा. झेंडा चौक, मु. पो. ता. माजलगाव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मोहिम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५७

सुनावणी दिनांक २९.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वनवे अशोक रावसाहेब,<br>मु. पो. रोहतवाडी, ता. पाटोदा, जि. बीड -४१४२०४ | : अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे :उपस्थित

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्ष श्री. विशाल अशोक वनवे यांच्या अध्यापक पदविका प्रथम वर्षाच्या उत्तर पत्रिकेच्या नकला न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. विशाल अशोक वनवे यांनी सप्टेंबर २००८ मध्ये

दिलेल्या अध्यापक शिक्षण पदविका परीक्षेमध्ये एकूण ९ विषयावर दिलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या प्रतींच्या नकला मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. अपिलार्थीस सदर माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने तपासलेल्या उत्तरपत्रिका ह्या गोपनीय असल्याने त्यांच्या सत्यप्रतीची कोणी मागणी केल्यास त्या देण्यात येऊ नये असा निर्णय घेतला असल्याचे कारण त्यांच्या या पत्रामध्ये दर्शविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०५.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०५.२००९ रोजी निर्णय देऊन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दाखवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने तपासलेल्या उत्तरपत्रिका ह्या गोपनीय असल्याने त्यांच्या सत्यप्रती कोणासही देऊ नयेत असा निर्णय घेतला असल्यामुळे आणि तसेच अशा प्रकरणी केंद्रीय माहिती आयोगाने देखील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास त्यांच्या उत्तरपत्रिका न देण्याचा निर्णय

दिला असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे स्पष्ट केले. या आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करण्यापूर्वीच व्यपगत झ ााला होता. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना आता माहिती देता येणे शक्य नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहितीच्या अधिकाराखाली जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या अध्यापक शिक्षण पदविका परीक्षेच्या सप्टेंबर २००८ मध्ये झालेल्या प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिकांच्या नकलेची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उत्तरपत्रिकाच्या प्रती संबंधितांना न पुरविण्याची भूमिका आयोगाने या पूर्वीच वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये घेतलेली आहे. या संदर्भात केंद्रीय माहिती आयोगाने देखील त्रेसा आयरिश विरुध्द केरळ पोस्टल सर्कल यांच्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"We as a Commission are not satisfied that the larger public interest justifies the disclosure of the information sought for by the appellant to direct that the CPIO to comply with the request of the appellant and as a matter of fact we are of the opinion that furnishing copies of the evaluated answer papers would be against public interest as been rightly opined by the appellate authority that supply of a copy of the evaluated answer paper would compromise the fairness and impartiality of the selection process. "

वरील निर्णयाचे अवलोकन केले असता व आयोगाची या विषयासंदर्भातील भूमिका पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगास आदेशित करता येणार नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक २९ . १० .२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. वनवे अशोक रावसाहेब, मु. पो. रोहतवाडी, ता. पाटोदा, जि. बीड -४१४२०४

२ जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.